



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. ०१ जानेवारी २०२६






मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०४६ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com


# धार्मिक कार्ड अन् शिंदेंची दांडी

- मंत्रिमंडळ निर्णय : भाजपचा 'विदर्भ'वर डोळा, आचारसंहितेच्या काळात केवळ एकच मोठा निर्णय

**मुंबई :** (समर्थ गांवकरी)

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचलेली असतानाच, वर्षअखेरच्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी "अंबादेवी' कार्ड वापरून विरोधकांसह मित्रपक्षांनाही बुचकळ्यात टाकले आहे. अमरावतीच्या प्रसिद्ध श्री अंबादेवी संस्थानाला चिखलदऱ्यातील ३ एकर मौल्यवान जमीन विनामूल्य देण्याचा मोठा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. या एका निर्णयाने भाजपने विदर्भातील हिंदू



मतांच्या ध्रुवीकरणाचा यशस्वी पाया घातल्याचे बोलले जात आहे. मात्र, याच वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अनुपस्थिती मंत्रालयातील राजकीय चर्चांचा "हॉट टॉपिक' ठरली आहे.

अमरावीच्या अंबादेवी संस्थानला जमीन देऊन भावनिक लाट निर्माण करण्याचा भाजपचा प्रयत्न.

१८ महापालिकांमध्ये सन्मानजनक जागा न मिळाल्याने मंत्री अस्वस्थ.

काही ठिकाणी मतभेद, पण उद्धव ठाकरेंच्या विरोधात लढताना विखुरलेले सैन्य भाजपला महागात पडू शकते, अशी भीतीही ३ एकर ८ आर जमीन, विनामूल्य वाटप आणि केवळ धार्मिक कार्यासाठी वापराची अट.

जागावाटपावरून महायुतीत सुरू असलेली धुसफूस आता चव्हाट्यावर आली. २९ पैकी केवळ ११ महापालिकांमध्ये युतीची अधिकृत घोषणा होऊ शकली. उर्वरित १८ ठिकाणी भाजपने प्रस्थापित जागांवर आपला दावा सोडण्यास नकार दिला. "भाजपने आम्हाला चर्चेच्या जाळ्यात अडकवून ठेवले आणि शेवटच्या क्षणी एकतर्फी रणनीती आखली,' अशी संतप्त भावना शिंदे सेनेच्या गोटात आहे.

### शिंदेंनी राजकीय संदेश दिला?

शिंदे गैरहजर राहिल्याने महायुतीमधील दरी वाढल्याचे संकेत आहेत. मंत्री उदय सामंत यांनी शिंदे तब्येतीमुळे आले नाहीत असा खुलासा केला असला, तरी यामागे जागावाटपातील तणाव असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. ठाण्याच्या "होमग्राउंड'वर भाजपने ज्या पद्धतीने आक्रमक फील्डिंग लावली आहे, ते पाहता शिंदेंनी बैठकीला दांडी मारून आपली नाराजीच व्यक्त केली.

# बीडकरांसाठी उभारणार २४१ कोटींची शासकीय कार्यालये

**बीड:** (समर्थ गांवकरी)

बीड शहरातील शासकीय कार्यालयाची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. त्यामुळे शासकीय कर्मचारी आणि कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना असुविधांचा सामना करावा लागत होते. आता शहरातील जवळपास सर्वच कार्यालयाचे काम सुरू झालेले असून ते अंतिम टप्यात आहेत. २०२६ मध्ये बीड शहरातील अनेक कार्यालय नविन इमारतीमध्ये जाणार आहेत. अनेक कार्यालय सध्या किरायाच्या खोलीत असून नागरिकांना कार्यकाल शोधताना अडचणी होत आहेत. आता एकाच छता खाली अनेक कार्यालय येणार आहेत. यासाठी तब्बल २४१ कोटी रूपयांचा निधी मंजूर झालेला असून काम अंतिम टप्यात आहेत.

भगवान बाबा मुलांचे वसतीगृह : ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी बीड शहरातील जिल्हा क्रीडा संकुलाच्या बाजूला १० कोटी रूपये खर्च करून वसतीगृह उभारण्याचे काम अंतिम टप्यात सुरू आहे. २०२६ ला हे काम पूर्व होईल. यामुळे ऊसतोड कामगारांच्या मुलांना दर्जेदार सुविधा मिळणार आहेत. भगवान बाबा मुलांच्या वसतीगृहाच्या बाजूलाच ५ कोटी रूपये खर्च करून जिल्हा ग्रंथालय होणार आहे. या इमारतीचे कामही प्रगतीपथावर आहे. बीड तहसील कार्यालय परिसरात ३० कोटी रूपये खर्च करून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत होत आहे.




## थोडक्यात...

### मनी प्लँट ग्रोथ कंपनीच्या मालकावर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर (समर्थ गांवकरी) : शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास 3 वर्षांत रक्कम 15 पटीने वाढवून देण्याचे अवास्तव आमिष दाखवून मनी प्लँट ग्रोथ कंपनीने 19 जणांना 75 लाख 75 हजार रुपयांना लुटले. या प्रकरणी कंपनीचा मालक संतोष तुकाराम कोकाटे (रा. गारखेडा) याच्याविरुद्ध पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या फसवणुकीची सुरुवात 22 सप्टेंबर 2020 रोजी झाली. फिर्यादी माजी सैनिक दत्तू यादवराव थोरात यांनी फेसबुकवर या कंपनीची जाहिरात पाहिली होती. सेव्हन हिल्स परिसरातील रघुवीर चेंबरमध्ये असलेल्या कार्यालयात गेल्यानंतर, संशयित आरोपी कोकाटे याने 'तीन वर्षांत रक्कम 15 पट करून देतो' असे सांगून थोरात यांचा विश्वास संपादन केला.

# चंद्रपुरातून आंतरराष्ट्रीय किडनी रॅकेट सुरू

## हॉस्पिटलसह डॉक्टर्सचे नाव उघड, एका किडनीची किंमत 80 लाखांपर्यंत

**चंद्रपूर :** (समर्थ गांवकरी)

सावकारी जाचाला कंटाळून एका शेतकऱ्याने किडनी विकल्याच्या धक्कादायक प्रकरणातून आता देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठे रॅकेट समोर आले आहे. चंद्रपूर पोलिसांनी या प्रकरणात कंबोडियातील मिलिटरी हॉस्पिटलसह तामिळनाडू आणि दिल्लीतील नामांकित डॉक्टरांचा सहभाग असल्याचे स्पष्ट केले आहे. पोलिस अधीक्षक मुमाक्का सुदर्शन यांनी पत्रकार परिषदेत या प्रकरणाचा थरार उघड केला. सावकारी पाशातून सुरू झाला 'किडनी'चा प्रवास नागभीड तालुक्यातील मिंथुर येथील शेतकरी रोशन कुडे यांनी १ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. व्याजासह ४८ लाख रुपये फेडल्यानंतरही सावकारांचा त्रास कमी झाला नाही. या त्रासातून मुक्त होण्यासाठी कुडे यांनी ऑनलाइन किडनी विक्री करणाऱ्या टोळीशी संपर्क साधला. त्यांना स्वतःच्या किडनीच्या मोबदल्यात



केवळ ८ लाख रुपये मिळाले. मात्र, तरीही सावकारांचा जाच सुरूच राहिल्याने त्यांनी अखेर पोलिसांत तक्रार केली आणि या रॅकेटचा भांडाफोड झाला.

या प्रकरणात अटक करण्यात आलेले रामकृष्ण सुंचू आणि हिमांशू भारद्वाज यांनी स्वतःची किडनी आर्थिक अडचणीमुळे विकली होती. त्यानंतर अधिक पैशांच्या मोहापायी ते स्वतःच डोनर शोधणारे एजंट बनले. रोशन कुडे आणि रामकृष्ण सुंचू यांची किडनी कंबोडियातील मिलिटरी हॉस्पिटलमध्ये काढण्यात आली, तर हिमांशूची किडनी तामिळनाडूतील त्रिची येथील स्टार किम्स हॉस्पिटलमध्ये काढण्यात आली होती.

एसआयटी तपासात तामिळनाडूच्या 'स्टार किम्स हॉस्पिटल'चे संचालक डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी आणि दिल्लीतील डॉ. रविंद्रपाल सिंग यांची नावे समोर आली. डॉ. सिंग यांना दिल्ली न्यायालयात हजर केले असता, त्यांना २ जानेवारी रोजी चंद्रपुरात हजर राहण्याचे आदेश दिले असून सध्या ते जामिनावर आहेत. डॉ. गोविंदस्वामी यांना ताब्यात घेण्यासाठी चंद्रपूर पोलिसांचे पथक तामिळनाडूमध्ये तळ ठोकून आहे. रोशन कुडे यांचा कंबोडियाला जातानाचा विमानतळावरील व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगवान केली. आतापर्यंत देशांतर्गत १० ते १५ अवैध किडनी प्रत्यारोपण झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या रॅकेटमध्ये देशातील अनेक नामांकित हॉस्पिटल्स आणि डॉक्टरांचा सहभाग असण्याची शक्यता असून पोलिस त्यादृष्टीने तपास करत आहेत.






# पत्रकारांचे महाराष्ट्राच नेतृत्व, कर्तृत्व, दातृत्वाचा त्रिवेणी संगम

# डॉ. विश्वासराव आरोटे



- पेपर विक्रेता ते पत्रकार, संपादक व मालक असा प्रेरणादायी प्रवास
- कोरोना काळात पत्रकारांसह गरजूंसाठी रोख रक्कम सह अन्नधान्य व कपडे वाटप
- कार्याची दखल घेऊन अमेरिकन विद्यापीठा ची मानद डॉक्टरेट

(समर्थ गांवकरी)

**पुत्र व्हावा ऐसा गुंडा, त्याचा तिन्ही लोकी झेंडा..**

या संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाप्रमाणाने आदिवासी अकोले तालुक्यातील एक युवक ग्रामीण भागात बातमीदारी करताना राज्यातील पत्रकारांची मोट बांधतो, या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवतो, या कार्याची दखल अमेरिकेतील विद्यापीठ घेते त्याबद्दल डॉक्टरेट जाहीर करते असा हा तिन्ही लोकात आपल्या नावाचा डंका गाजवणारे व्यक्तिमत्व, पेपर विकून शिक्षण घेऊन वृत्तपत्राचे मालक झालेले अकोले तालुक्याचे भूमिपुत्र, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस, दै. समर्थ गावकरी चे मालक डॉ. विश्वासराव आरोटे होय.

महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाईच्या पायथ्याशी वसलेल्या, आदिवासी डांग भाग असलेल्या अकोले तालुक्यातील चितळवेढे या छोट्याशा डोंगर कुशीतील आणि अमृतवाहिनी प्रवरामाईच्या तिरावर असलेल्या गावी विश्वासराव आरोटे यांचा जन्म झाला. परिस्थिती सामान्य असल्यामुळे शिक्षण घेत असताना सकाळी चितळवेढे येथून दूध वाटप करून, नंतर वर्तमानपत्र वाटण्याचे काम करायचे, वर्तमानपत्र वाटत असताना वर्तमानपत्र वाचण्याची गोडी निर्माण झाली. ग्रामीण भागात वृत्तपत्राचा खप वाढवायचा असेल तर त्या भागातील समस्या वृत्तपत्रात येणे आवश्यक आहे याची जाणीव विश्वासरावांना झाल्यानंतर त्यांनी ग्रामीण भागातूनच आपल्या पत्रकारीतेचा श्रीगणेशा केला. ग्रामीण भागातील समस्या आपल्या लेखणीच्या माध्यमातून मांडण्यास सुरवात केली. ध्येयवेडी स्वप्ने उराशी बाळगून कर्तव्य करत राहिले यावेळी ग्रामीण भागातील वास्तव मांडताना अनेक अडीअडचणी आल्या. अकोले तालुक्याला विचारांचा वारसा लाभलेला असल्यामुळे पत्रकारीता क्षेत्रातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांशी त्यांची विचारसरणी जुळली. त्यातूनच मार्गदर्शनाची दिशा मिळत गेली . कर्तृत्व आणि नेतृत्व याचा सुरेख संगम अस्तित्वात आला. लेखणीला चालना देता देता ग्रामीण भागातील वास्तव मांडतांना व दैनिक गावकरी या वृत्तपत्रात काम करत असताना ग्रामीण भागातील पत्रकारांशी त्यांची नाळ जोडली गेली त्यातूनच ग्रामीण समस्यांची उकल त्यांनाच झाली. समस्या सोडवण्यासाठी काही तरी केले पाहिजे या उद्देशाने संघटना बांधणी सुरू केली. वार्ताहर म्हणून अनेक वृत्तपत्रांमध्ये काम केल्या नंतर तालुका प्रतिनिधी आणि नंतर विभागीय कार्यालयाचे उपसंपादक म्हणून त्यांनी 'दैनिक गांवकरी' या उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिकाची जबाबदारी यशस्वीरीत्या पेलली. गांवकरीच्या माध्यमातून ग्रामीण भागाची, या भागातील ग्रामस्थांची विश्वासार्हता जपली. त्यांचे प्रश्न आपल्या लेखनीच्या माध्यमातून सातत्याने मांडले. पत्रकारीता करत असतानाच ग्रामीण भागातील पत्रकारांशी देखील त्यांची नाळ जोडली गेली. या पत्रकारांच्या समस्या त्यांना समझू लागल्या. या समस्या सोडविण्यासाठी काही तरी केले पाहिजे, असे सारखे वाटत होते. त्यांनी ग्रामीण भागात काम करणाऱ्या पत्रकारांची मोट बांधली. सर्वांना बरोबर घेऊन अकोले तालुका ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना केली. या पत्रकार संघाच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांसाठी खऱ्या अर्थाने कार्य सुरु केले. हे काम करत असतानाच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्यसंघटक संजयजी भोकरे यांचा संपर्क आला. दोघांचेही ध्येय एकच.. पत्रकारांच्या समस्या सातत्याने मांडून त्यासाठी राज्यस्तरावर नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करणे. ध्येय्य एकच असल्याने या जोडगोळीने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून एकत्रित काम सुरु केले.

पत्रकारांसाठी चालविल्या जात असलेल्या या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी राज्यस्तरीय अधिवेशने घेतली. जिल्ह्यात, तालुक्यात विविध मेळावे घेतले. राज्यभरातील सर्व जिल्ह्यातील पत्रकारांना या पत्रकार संघामध्ये सामावून घेतले. प्रत्येकाला संघाचे ओळखपत्र देऊन नवी ओळख दिली. सर्वच जिल्ह्यातील पत्रकारांचा विमा काढून खऱ्या अर्थाने पत्रकार संघ या पत्रकारांसाठी काम करत असल्याचा विश्वास निर्माण केला. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना अहमदनगर जिल्हाध्यक्ष आणि नंतर राज्य सरचिटणीस या पदावर काम करण्याची संधी दिली. राज्य कार्यकारिणीवर काम करतानाच त्यांचे काम अतिशय जोमाने सुरु झाले.

स्पर्धा परीक्षां बरोबरच क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणवंतांचा राज्यस्तरावर गौरव पत्रकारसंघाच्या माध्यमातून केला जात आहे. हलाखीची परिस्थिती असणाऱ्या पत्रकारांना औषधोपचारासाठी व इतर गरजा भागविण्यासाठी पत्रकारसंघाच्या माध्यमातून आर्थिक मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्नही विश्वासरावआरोटे यांनी केला आहे. अशा राज्यभरातून अनेक पत्रकारांना संघटनेने आर्थिक मदत केलीआहे.

पत्रकारिता करताना निस्वार्थीपणाची भावना अंगीकारून पत्रकारांच्या समस्यांचे निराकरण करून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पत्रकार संघाचा अमृतवेल वाढविण्याचे काम व ग्रामीण पत्रकारांना व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम करून देण्याचे काम विश्वासराव आरोटे यांनी केले.

पत्रकारांना संरक्षण मिळावे यासाठी संरक्षण कायदा व्हावा यासाठी ते नेहमीच आग्रही राहीले. पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांचा निषेध करत आरोपींना अटक होईपर्यंत पाठपुरावा केला. ग्रामीण भागातील पत्रकारांनाही श्रमिक पत्रकारांप्रमाणेच अधिस्वीकृती कार्ड मिळावे, एस. टी. बस तसेच रेल्वेसारख्या विविध सवलती मिळाव्यात, शासनाने आरोग्य विमा काढावा, पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती द्याव्यात, पत्रकारांना निवासी व्यवस्था उपलब्ध करावी या व अशा अनेक मागण्यांसाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रामाणिक प्रयत्न विश्वासराव आरोटे करत आहेत. चैत्यभूमी नागपूर ते मंत्रालय मुंबई अशी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पत्रकार संवाद यात्रा काढली. सरकारला या यात्रेची दखल घेऊन पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करावे लागले. हे त्यांचे कार्याचे यश आहे.

विश्वासराव आरोटे यांनी राज्यातील सर्व पत्रकारांना हेल्मेट वाटप केले. दरवर्षी छत्री, रेनकोट वाटप करतात. डायरी, पेन, कॅलेण्डर दिले जाते. दिवाळी गोड व्हावी म्हणून मिठाई सह दिवाळी किट दिले जाते.

कोरोनाच्या काळात किराणा किट, कपडे वाटप करून एकलं महिलांना आधार देण्याचे काम आरोटे यांनी केले. कोरोना काळात मास्क, सनेतायजार वाटप केले. गरिबांना अन्न धान्य, किराणा दिला. आदिवासी भागात साड्या वाटप करण्याचे काम करित असतात. अनेक पत्रकारांना रोख मदत या काळात केली. कोरोना योध्यांचा मान सन्मान केला. त्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन दिले.

आपण गरिबीत शिकलो, ते शिकताना कष्ट झेलले त्यातून एखादा गरीब विध्यार्थी मागे राहू नये म्हणून राज्यभर गरीब विध्यार्थ्यांना वह्या व शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचे काम करतात. या विध्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप म्हणून गुणवंत विध्यार्थी यांचा सन्मान करण्याचे काम वर्षभर चालू असते.



विश्वासराव आरोटे यांच्या या कार्याची दखल अनेक संस्था घेत असतात, त्यांना अनेक पुरस्कार मिळाले असुन त्यांनी केलेल्या कार्याचा तो सन्मान आहे. पण राज्यात, देशात नव्हे तर सातासमुद्रा पार अमेरिकेच्या विद्यापीठाने दखल घेत डॉकटरेट दिली. हा खरा त्यांच्या सामाजिक कार्याचा उचित बहुमान झाला आहे.

पेपर विकताना जे स्वप्न उराशी बाळगले होते ते सत्यात उतरवत आज भांडवलशाही वृत्तपत्रांना उत्तर देण्यासाठी स्वतःच्या मालकीचे दैनिक समर्थ गावकरी सुरू केले असून ग्रामीण भागातील पत्रकारांना या वृत्तपत्राच्या माध्यमातून काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे कधीकाळी आपली बातमी पेपरात छापून यावी यासाठी कष्ट करणारे विश्वासराव आज नुसते संपादकच नव्हे तर वृत्तपत्राचे मालक झाले आहे या वृत्तपत्रात राज्यातील कानाकोपऱ्यातील बातम्यांना प्रसिद्धी दिली जाते.

**समाजासाठी अविरत कार्यरत** : डॉ. विश्वासराव आरोटे हे केवळ पत्रकारच नव्हे, तर सामाजिक कार्यकर्तेही आहेत. गरजूंसाठी विविध प्रकारच्या मदतीचे उपक्रम राबवत त्यांनी लोकांमध्ये विश्वास निर्माण केला आहे. पत्रकारिता करताना सामाजिक बांधिलकी जपताना थोर समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या माध्यमातून अनेक सामाजिक धार्मिक कार्य सुरू केले आहे. समाजकल्याण न्यास चे राज्य उपाध्यक्ष म्हणूनही राज्यात अनेक सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत.

आपल्या कर्तृत्वाचा, नेतृत्वाचा अन दातृत्वाचा झेंडा अकोले तालुक्यात नव्हे तर राज्यभर फडकविणाऱ्या कळसुबाई शिखरच्या उंची लाभलेल्या विश्वासराव आरोटे यांना त्यांच्या वाढदिवसाच्या निमीत्ताने परमेश्वराकडे एकच मागेन की त्यांना उदंड, निरामय, आयुष्य मिळो. चांगले आरोग्य लाभो, हिच मागणी.

**वाढदिवसाच्या निमित्ताने खुप खुप शुभेच्छा!**

**संकलन**

श्री. भाऊसाहेब वाकचौरे पाटील

प्रसिद्धीप्रमुख

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, नगर जिल्हा




























# ग्रामीण भागातून जागतिक स्तरापर्यंतचा प्रवास

- डॉ. विश्वासराव आरोटे यांचे पत्रकारितेतील अनोखे योगदान!
- पत्रकारांच्या हक्कांचे बुलंद व्यासपीठ: डॉ. विश्वासराव आरोटे यांची संघर्षगाथा!
- डॉ. विश्वासराव आरोटे: पत्रकारांचे माऊली आणि त्यांच्या संघर्षाचा इतिहास!



(समर्थ गांवकरी)

पत्रकारितेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ग्रामीण पत्रकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारे नेते, पत्रकारितेच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे डॉ. विश्वासराव आरोटे हे नाव आज महाराष्ट्रभर परिचित आहे. पेपर विक्रेता ते पत्रकार आणि तिथून स्वतःच्या दैनिकाचा संपादक असा हा प्रेरणादायी प्रवास आहे. गरिबीतून सुरू झालेला त्यांचा जीवनप्रवास आज ग्रामीण पत्रकारांसाठी लढणाऱ्या प्रमुख नेतृत्वापर्यंत पोहोचला आहे.

**सामान्य परिस्थितीतून घडलेले असामान्य व्यक्तिमत्त्व**

महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखर कळसुबाईच्या कुशीतील चितळवेढे (ता. अकोले) या छोट्या खेड्यात 1 जानेवारी रोजी त्यांचा जन्म झाला. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. बालपणापासूनच शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला. सकाळी दूध टाकणे आणि पेपर वाटणे, हे काम करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. माध्यमिक शिक्षण मा. मधुकरराव पिचड विद्यालय, राजुर येथे तर महाविद्यालयीन शिक्षण अकोले महाविद्यालयात पूर्ण केले.

**पत्रकारितेची ओढ आणि सुरुवात**

वर्तमानपत्र वाटत असताना वाचनाची आवड निर्माण झाली आणि वाचता वाचता आपण पत्रकार व्हावे, ही इच्छा निर्माण झाली. हीच इच्छा पुढे त्यांच्या कार्याचा पाया ठरली. ग्रामीण भागातील समस्या समजून घेऊन त्यांचे प्रतिबिंब आपल्या लेखणीतून मांडत त्यांनी पत्रकारितेत पाऊल टाकले.

**पत्रकार संघटनेचे नेतृत्व**

ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी लढा देण्याचा निश्चय करून त्यांनी अकोले तालुका पत्रकार संघाची स्थापना केली. यानंतर त्यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून ग्रामीण पत्रकारांच्या समस्यांवर आवाज उठवला. त्यांनी ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी विमा योजना, एसटी-रेल्वे सवलती, शासनाकडून मान्यताप्राप्त अधिस्वीकृती कार्ड, शैक्षणिक सवलती, आणि आरोग्य विमा योजना या अनेक मागण्यांसाठी पाठपुरावा केला.

**अनेक जबाबदाऱ्या आणि पुरस्कारांचा सन्मान**

त्यांनी 'दैनिक गांवकरी' या अग्रगण्य वृत्तपत्रात तालुका प्रतिनिधी ते उपसंपादक अशी जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. त्यांच्या कार्यकाळात राज्यभरातील पत्रकारांसाठी मेळावे, अधिवेशने, आणि संवाद यात्रांचे आयोजन झाले.

त्यांनी कोरोना काळात पत्रकारांसह गरजूंसाठी अन्नधान्य व कपडे वाटप केले.

त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. अमेरिकन विद्यापीठाने त्यांना मानद डॉक्टरेटने गौरविले.

**राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरची ओळख**

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, अण्णा हजारे, शरद पवार, उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांसारख्या अनेक नेत्यांकडे त्यांनी पत्रकारांच्या समस्यांबाबत सातत्याने पाठपुरावा केला. पत्रकार संरक्षण कायदा व्हावा, यासाठी ते नेहमी आग्रही राहिले.

**समाजासाठी अविरत कार्यरत**

डॉ. विश्वासराव आरोटे हे केवळ पत्रकारच नव्हे, तर सामाजिक कार्यकर्तेही आहेत. गरजूंसाठी विविध प्रकारच्या मदतीचे उपक्रम राबवत त्यांनी लोकांमध्ये विश्वास निर्माण केला आहे.

वाढदिवसानिमित्त शुभेच्छा : आज त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने पत्रकार संघटनेच्या वतीने त्यांना भरभरून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

"परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य देवो," अशीच प्रार्थना आज प्रत्येक पत्रकार करत आहे.

(संकलन: श्री. भाऊसाहेब वाकचौरे पाटील, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, नगर जिल्हा)

## सावित्रीमाई फुले व फातिमा शेख यांची संयुक्त जयंतीचे आयोजन

**पारनेर :** (समर्थ गांवकरी)




स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले आणि त्यांना खांद्याला खांदा लावून साथ देणाऱ्या पहिल्या मुस्लिम शिक्षिका क्रांतिदूत फातिमा शेख यांची संयुक्त जयंती शनिवार, दि. ३ रोजी पारनेर मध्ये साजरी केली जाणार आहे. दुपारी ३ वाजता 'आनंद लॉन्स' येथे हा सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती 'सावित्री-फातिमा सदभावना मंच'चे कार्याध्यक्ष डॉ. रफिक सय्यद यांनी दिली आहे. आजच्या आधुनिक काळात स्त्रिया राष्ट्रपती, प्रधानमंत्री, जिल्हाधिकारी ते शास्त्रज्ञांपर्यंत सर्वच उच्च पदांवर कार्यरत आहेत. हे यश सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी घेतलेल्या अपार कष्टांचे फळ आहे. सावित्रीमाईंनी जेव्हा शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचवण्याचे कार्य सुरू केले, तेव्हा त्यांना फातिमा शेख यांची मोलाची साथ लाभली. इतिहासातील या दोन महान स्त्री शक्तींच्या ऋणांची जाणीव करून देण्यासाठी आणि सामाजिक सलोखा जपण्यासाठी या संयुक्त जयंतीचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजाच्या विविध क्षेत्रात विविध पदांवर कार्यरत असणाऱ्या महिला मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. डॉ. विद्या कावरे (नगराध्यक्षा, पारनेर नगरपंचायत) शगुप्ता शेख,ॲड. सुनीता शिंदे ॲड. सविता नगरे, ॲड. मोनिका सोनवणे, सरस्वती जावळे,प्रिती कांबळे या मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले आणि फातिमा शेख यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात येईल.

## आधुनिक केसरी माध्यम समूहाच्या एडिटोरिअल बोर्ड चेअरमनपदी वसंत मुंडे यांची निवड

**छ.संभाजीनगर :** (समर्थ गांवकरी)



केसरी माध्यम समूहाने गुणवत्ता, वैचारिक स्पष्टता आणि विश्लेषणात्मक पत्रकारिता अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या राज्यस्तरीय एडिटोरिअल बोर्ड चेअरमनपदी ज्येष्ठ पत्रकार वसंत मुंडे यांची निवड करण्यात आली आहे. पत्रकारिता क्षेत्रातील दीर्घ अनुभव आणि निर्भीड, वस्तुनिष्ठ व लोकाभिमुख पत्रकारितेसाठी वसंत मुंडे ओळखले जातात. केसरी वृत्तसमूहासाठी हे महत्वाचे पाउल ठरणार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील केसरी माध्यम समूहाच्या कार्पोरेट कार्यालयात राज्यस्तरीय संपादक मंडळाची पहिली बैठक मुख्य संपादक धनंजय लांबे यांच्या उपस्थितीत झाली. या वेळी संपादक मंडळातील, जेष्ठ संपादक डॉ. अनिल फळे, रवींद्र चिंचोलकर, राजेंद्र शहापूरकर, विजय पाठक, तहसिन खान, डॉ. प्रभू गोरे आदी उपस्थित होते. तर ज्येष्ठ संपादक श्री सुनील पाटील,श्री शाम जैन, श्री दिलीप राठी,श्री सतीश कुलकर्णी,श्री सुनील क्षीरसागर,श्री प्रा.प्रकाश शिरसाट,श्री दिलीप महालिंगे यांचा एडिटोरियल बोर्डात सामावेश आहे.

केसरी वृत्तसमूहाने पाच वर्षापासून डिजिटल आणि प्रिंट माध्यमांत आपली विश्वासार्हता अधिक दृढ केली आहे. तर माध्यम क्षेत्राच्या इतिहासात पहिल्यांदाच विविध विचारांच्या ज्येष्ठ संपादकांचे राज्यस्तरीय संपादक मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळाचे माध्यमक्षेत्रासह समाजातील सर्वांनी उत्स्फूर्त स्वागत केले. या मंडळाच्या माध्यमातून राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, शेती, सहकार, उद्योग आणि संस्कृती अशा विविध विषयांवर सखोल, अभ्यासपूर्ण व निष्पक्ष मांडणी केली जात आहे.

संपादक मंडळाच्या पहिल्या बैठकीत सर्वानुमते ज्येष्ठ पत्रकार वसंत मुंडे यांची एडिटोरिअल बोर्ड चेअरमनपदी निवड करण्यात आली. आता वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली हे संपादक मंडळ केसरी वृत्त समूहाच्या पत्रकारितेला नवी दिशा देईल, वाचकांचा विश्वास अधिक दृढ करेल आणि मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा आदर्श निर्माण करेल, असा विश्वास माध्यम समूहाकडून व्यक्त करण्यात आला आहे. वसंत मुंडे यांनी 'लोकसत्ता'मध्ये वीस वर्षांपेक्षा अधिक काळ काम करताना, विविध विषयांवर रोखठोक लिखाण करत आपली ओळख निर्माण केली. तर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष म्हणून पत्रकारांच्या प्रश्नांसाठी दीक्षाभूमी नागपूर ते मंत्रालय मुंबई अशी ऐतिहासिक पत्रकार संवाद यात्रा काढली होती. वृत्तपत्रांचे अर्थाकारण या विषयावर त्यांनी चळवळ उभी केली. अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष असताना ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी ठोस निर्णय घेतले होते. मुंडे यांच्या पत्रकारितेतील कामाची दखल घेऊन एबीपी माझा वृत्तवाहिनीने त्यांना 'महाराष्ट्राचे अनमोल रत्न' पुरस्काराने सन्मानित केले, तर लोकमत मीडिया ग्रुपने एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम पुरस्कार दिला होता. यासह विविध संस्थांनी त्यांना पुरस्कार देऊन गौरवले आहे. त्यांच्या निवडीने केसरी माध्यम समूहाला मोठे बळ मिळाले आहे. याबाबत मुख्य संपादक धनंजय लांबे व संपादक डॉ. प्रभू गोरे यांच्यासह सर्व संपादकांनी मुंडे यांचे अभिनंदन केले आहे.

### नवा प्रयोग, दिशादर्शक

प्रसार माध्यमांचे स्वरूप झपाट्याने बदलत असल्याने माहितीच्या कोलाहलात सत्य शोधण्याचे आवाहन उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत अनुभवी ज्येष्ठ संपादकांचे राज्यस्तरीय संपादक मंडळ स्थापन करून लोकांना, प्रिंट आणि डिजिटल च्या एकाच प्लॅटफॉर्मवर विश्लेषणात्मक माहिती देण्याचा प्रयत्न यशस्वी होईल आणि दिशादर्शक ठरेल, असा विश्वास वसंत मुंडे यांनी व्यक्त केला आहे.



## अखेर अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर निवाणे येथे संयुक्त लोकार्पण सोहळा संपन्न

**कळवण :** (समर्थ गांवकरी)

- दीर्घ प्रत्यक्ष नंतर माजी मंत्री डॉ भारती ताई पवार, आमदार नितीन भाऊ पवार यांच्या संयुक्त विद्यमाने लोकार्पण सोहळा संपन्न

कळवण तालुक्यातील निवाणे ग्रामपंचायतीच्या नूतन इमारतीचे तसेच संस्कृती भवनाचे अखेर बहुप्रतिक्षित लोकार्पण मोठ्या उत्साहात पार पडले. हा संयुक्त लोकार्पण सोहळा माजी मंत्री डॉ. भारतीताई पवार व आमदार नितीन भाऊ पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते संपन्न झाला.

या कार्यक्रमावेळी निवाणे गावातील विविध वक्त्यांनी दिवंगत माजी मंत्री, लोकनेते स्व. ए. टी. पवार यांच्या कळवण तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी असलेल्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांची आठवण करून दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली तालुक्याने विकासाची नवी दिशा घेतली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी माजी मंत्री डॉ. भारतीताई पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "माझ्या राजकीय वाटचालीतील *जिल्हा परिषद सदस्य पदाची सुरुवात याच निवाणे गावातून झाली आहे." तसेच निवाणे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यात कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास त्यांनी ग्रामस्थांना दिला.

आमदार नितीन भाऊ पवार यांनीही आपल्या आठवणींना उजाळा देताना सांगितले की, "निवाणे गावाने मला पहिल्यांदा पंचायत *समिती सभापती बनवले, तसेच विधानसभा निवडणुकीतही तालुक्यातून सर्वाधिक मतदान दिले." याबद्दल त्यांनी ग्रामस्थांचे आभार मानले.

या लोकार्पण सोहळ्यास गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, सर्व पक्षीय राजकीय नेते, शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रात्रीच्या वेळी आमदारांच्या गावालाच बस नाही

- राजूरकर प्रवासी त्रस्त!
- निवेदनांपुरते आश्वासन, प्रत्यक्षात मात्र 'रात गयी बात गयी'ची भूमिका!

**राजूर :** (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यातील राजूर गावाला रात्रीच्या वेळी एसटी बससेवा उपलब्ध नसल्याने प्रवासी वर्ग प्रचंड त्रस्त झाला आहे. "बघू, करू, सांगू पाहू" अशी नेहमीची उत्तरे ऐकून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, विशेष म्हणजे सत्ताधारी पक्षाचे लोकप्रतिनिधी अकोले तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या गावालाच रात्री बससेवा नसणे हा प्रकार सर्वसामान्य प्रवाशांमध्ये संताप निर्माण करणारा ठरत आहे.

राजूर हे अकोले तालुक्यातील महत्त्वाचे गाव असून, शिक्षण, नोकरी, आरोग्य सेवा तसेच दैनंदिन व्यवहारांसाठी नागरिकांना अकोले, संगमनेर, नगर व पुणे येथे ये-जा करावी लागते. मात्र सायंकाळी सहा वाजल्यानंतर राजूर मार्गावर एसटी बस बंद असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक वेळा बस स्थानकात ठरवून दिलेल्या वेळेत गाड्या उपलब्ध नसतात, तर कधी अचानक "रात्रीच्या सर्व गाड्या रद्द" असा संदेश अकोले बस स्थानकातून प्रवाशांना दिला जातो.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, कोरोना काळात अकोले तालुक्यातील अनेक गावांसाठी असलेल्या मुक्कामी बस आगार प्रमुखांनी बंद केल्या. या बस सकाळी शालेय विद्यार्थ्यांना, महाविद्यालयीन तरुणांना तसेच शेतकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणी आणण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत होत्या. मात्र आजही त्या बस पुन्हा सुरू करण्यात आलेल्या नाहीत. परिणामी खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत असून आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे.

अकोले आगार प्रमुखांच्या कार्यपद्धतीवर तीव्र टीका होत असून, निष्काळजीपणा व निष्क्रियता अनेक वर्षांपासून सुरू असल्याचा आरोप प्रवाशांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे आगार प्रमुख याआधी शेजारच्या सिन्नर तालुक्यात कार्यरत होते. सिन्नर–अकोले बससेवा नियमित असताना, अकोले तालुक्यातील अंतर्गत गावांकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

याबाबत लोकप्रतिनिधींकडे तक्रारी केल्या असता समोर काहीतरी वेगळे सांगितले जाते आणि प्रत्यक्षात मात्र वेगळीच चर्चा सुरू असल्याचा आरोप आहे. "राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आमचे जवळचे आहेत, त्यामुळे आमचे कोणी काही करू शकत नाही," अशी बुलेट चर्चा आगारात सुरू असल्याचेही प्रवाशांचे म्हणणे आहे. त्यामुळे अधिकारी कोणतीही ठोस कारवाई करत नसल्याचा आरोप बळावत आहे.

या पार्श्वभूमीवर राजूर व परिसरातील प्रवाशांनी पुन्हा एकदा लेखी निवेदन देऊन रात्रीच्या वेळी राजूर मार्गावर एसटी बस सुरू करण्याची मागणी केली आहे. मात्र निवेदन स्वीकारून प्रवाशांची समजूत काढली जाते आणि नंतर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने "रात गयी बात गयी" अशी परिस्थिती कायम असल्याचे नागरिक सांगतात.

आता तरी आमदार डॉ. किरण लहामटे यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष घालून अकोले–राजूर मार्गावर नियमित रात्रीची बससेवा सुरू करावी, तसेच बंद करण्यात आलेल्या मुक्कामी बस पुन्हा कार्यान्वित कराव्यात, अशी जोरदार मागणी राजूरकर प्रवाशांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही नागरिक देत आहेत.

## गरिबीतून घडलेलं समृद्ध मन : डॉ. विश्वासराव आरोटे

### डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

### शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

- विश्वास देणारा आणि विश्वास जपणारा माणूस
- विश्वासावर उभा राहिलेला विश्वासू नेतृत्वाचा प्रवास

(समर्थ गांवकरी)



: शब्दांकन :
श्री. प्रतिक गंगणे
(दै. समर्थ गांवकरी पुणे निवासी संपादक)
७२७६३१४१४२

विश्वास ही केवळ भावना नसून ती जबाबदारी असते. ती जपण्यासाठी सातत्य, प्रामाणिकपणा आणि निष्ठा लागते. गेली सहा वर्षे दै. समर्थ गांवकरी या दैनिकाची धुरा डॉ. विश्वासराव आरोटे यांनी माझ्यावर सोपवली. हा विश्वास केवळ पदाचा नव्हता, तर माणुसकीचा, विचारांचा आणि पत्रकारितेच्या मूल्यांचा होता. तो विश्वास प्रामाणिकपणे जपता आला, याचे समाधान शब्दांत मांडता येणार नाही.

ग्रामीण महाराष्ट्राच्या मातीतून घडलेले, संघर्षातून तपासले गेलेले आणि अनुभवातून परिपक्व झालेले व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. विश्वासराव आरोटे. पेपर विक्रेत्यापासून ते संपादक, संघटक आणि विचारवंत नेतृत्वापर्यंतचा त्यांचा प्रवास हा केवळ यशाचा आलेख नाही, तर हजारो ग्रामीण पत्रकारांसाठी प्रेरणादायी वाट आहे.

कळसुबाईच्या पायथ्याशी वसलेल्या चितळवेढे (ता. अकोले) या छोट्याशा गावात जन्मलेल्या विश्वासराव आरोटे यांचे बालपण हालाखीच्या परिस्थितीत गेले. शिक्षण घेत असतानाच दूध वाटप, वर्तमानपत्र वितरण अशी कामे करत त्यांनी जीवनाचा संघर्ष अनुभवला. मात्र, याच वर्तमानपत्रांच्या सहवासातून वाचनाची, विचारांची आणि पत्रकारितेची ओढ निर्माण झाली.

ग्रामीण भागातील प्रश्न, अन्याय, व्यथा आणि वास्तव जर समाजापर्यंत पोहोचवायचे असतील, तर ते ग्रामीण पत्रकारांच्या लेखणीतूनच शक्य आहे. ही जाणीव त्यांना लवकरच झाली. इथूनच त्यांच्या पत्रकारितेचा खरा श्रीगणेशा झाला.



ग्रामीण भागात पत्रकार म्हणून काम करत असताना, पत्रकारांच्या असुरक्षिततेची, आर्थिक अडचणींची आणि सामाजिक दुर्लक्षाची जाणीव त्यांना प्रकर्षाने झाली. यावर केवळ लिहिणे पुरेसे नाही, तर संघटित होणे गरजेचे आहे, हा विचार दृढ होत गेला. त्यातूनच अकोले तालुका ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना झाली.

हीच चळवळ पुढे राज्यपातळीवर पोहोचली. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण पत्रकारांना ओळख, व्यासपीठ आणि आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी अथक प्रयत्न सुरू ठेवले. विमा योजना, अधिस्वीकृती कार्ड, एसटी-रेल्वे सवलती, आरोग्य विमा, शैक्षणिक सवलती. या सर्व मागण्यांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

संघटनात्मक कामासोबतच सामाजिक भान जपत डॉ. आरोटे यांनी अनेक उपक्रम राबवले. कोरोनाच्या कठीण काळात पत्रकार, गरजू कुटुंबे, एकल महिला आणि आदिवासी बांधवांसाठी अन्नधान्य, कपडे, मास्क, सॅनिटायझर वाटप करण्यात आले. राज्यभरातील पत्रकारांना हेल्मेट, रेनकोट, छत्र्या, दिवाळी साहित्य देऊन त्यांनी माणुसकीचा हात पुढे केला.

गरिबीतून शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला शिक्षणाचे महत्त्व अधिक कळते. त्यामुळेच राज्यभरातील गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या, शैक्षणिक साहित्य वाटप आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हे उपक्रम ते सातत्याने राबवत आहेत.

एकेकाळी ज्यांची बातमी छापून यावी म्हणून धडपड होती, तेच आज दै. समर्थ गांवकरी या दैनिकाचे संस्थापक-संपादक म्हणून ग्रामीण पत्रकारांना संधी देत आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यातील प्रश्नांना आवाज देणारे हे दैनिक म्हणजे ग्रामीण पत्रकारितेचा आत्मविश्वास आहे.

त्यांच्या कार्याची दखल केवळ राज्य किंवा देशातच नव्हे, तर परदेशातही घेण्यात आली. अमेरिकेतील विद्यापीठाकडून मिळालेली मानद डॉक्टरेट ही त्यांच्या सामाजिक आणि पत्रकारितेतील योगदानाची जागतिक पातळीवरील पोचपावती आहे.

डॉ. विश्वासराव आरोटे हे केवळ संघटनेचे पदाधिकारी किंवा वृत्तपत्राचे मालक नाहीत; ते नात्यांमध्ये, माणसांमध्ये आणि कामात विश्वास जपणारे नेतृत्व आहेत. गेली सहा वर्षे त्यांनी दिलेला विश्वास ही माझ्यासाठी प्रेरणा आणि जबाबदारी ठरली. त्या विश्वासाच्या पायावर उभा राहून काम करता आले, हेच माझे समाधान आहे.

**त्यांच्या पुढील वाटचालीसाठी, उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिक व्यापक कार्य घडो, हीच मनापासून शुभेच्छा.**

# तालुक्यातील बाल वीर पुरस्काराचे वितरण

जामखेड तालुका: (समर्थ गांवकरी)

- एका शासकीय कार्यालयाने आदर्श असा नवीन पायंडा पाडला. स्तुत्य उपक्रम आहे.
- ईतर शासकीय कार्यालयानी यापासून काही तरी बोध घ्यावा
- समाजातील विविध क्षेत्रातील घटकांचा आदर सत्कार करायला काहीच हरकत नाही
- विविध मान्यवरांच्या उपस्थितीत बाल शौर्य पुरस्काराचे वितरण




महाराष्ट्र शासन कौशल्य विकास रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग मार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जामखेड यांच्या वतीने वीर बाल दिवस निमित्त बाल शौर्य पुरस्कार पुरस्कार जाहीर करण्यात आला.

ते पुढील प्रमाणे आहेत. शौर्य विभाग- श्रेयश महादेव धांडे नागेश विद्यालयात इयत्ता नववी मध्ये शिकणाऱ्या या विद्यार्थ्यांने शेततलावामध्ये बुडत असलेल्या अकरावीच्या विद्यार्थ्याला जीव धोक्यात घालून वाचवले

क्रीडा विभाग- श्रेयस सुदाम वराट राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत रौप्य पदक पटकावले. कु. स्नेहल दत्तात्रय भोसले खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून दिले. पुणे विद्यापीठास सुवर्णपदक मिळवून दिले. राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक मिळवून दिले.

अशा या गुणी व होतकरू बालविरांचा आज विविध मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष (आय एम सी सदस्य) मुख्याध्यापक दत्ता काळे, प्रमुख पाहुणे कॅप्टन लक्ष्मण भोरे, पत्रकार सुदाम वराट, मयूर भोसले, संतोष (बबलू) टेकाळे, संस्थेचे प्राचार्य अजय वाघ, के डी गायकवाड, विठ्ठल काळे, ओंकार पिसे, सतीश हारदे, विजयकुमार तवटे, जालिंदर सुसे, सुरेश मुळे, श्रीराम सकनुरे, ईश्वर सानप, विनायक किंबहुने, राजाभाऊ शिंदे,श्रीम सुरेखा महाडिक, निरपणे मॅडम, गायकवाड सर, जाधव सर, साळुंखे सर, सुद्रिक सर, आधी मान्यवर शिक्षक विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे मयूर भोसले म्हणाले की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने अतिशय

स्तुत्य कार्यक्रम घेतला आहे योग्य पुरस्कार दिले आहेत, संस्थेचा चांगला उपक्रम आहे. भविष्यात पुरस्काराचे स्वरूप मोठे करू

प्रशिक्षक संतोष टेकाळे म्हणाले की, पहिलाच उपक्रम आहे शौर्य गाजवलेल्यांना सन्मानित केले आहे. समाजात यामुळे मोठी प्रेरणा मिळणार आहे.

प्राचार्य अजय वाघ म्हणाले की वीर बालकांचा सन्मान दरवर्षी करण्यात येणार आहे. झोकून देऊन काम केले कि, यश मिळतेच

कॅप्टन लक्ष्मण भोरे म्हणाले की, बालवीरांनी आपले नाव देशात केले आहे असे कार्यक्रम आवश्यक आहे



# मानव–बिबट संघर्षाबाबत जनजागृती कार्यक्रम संपन्न!

ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावात मानव व बिबट यांच्यात वाढणाऱ्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम Wild Land Conservation Foundation, नागपूर आणि वन विभाग अकोले प्रादेशिक यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. कार्यक्रमात वन्यजीव संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञ अजिंक्य भामबुरकर यांनी उपस्थित ग्रामस्थांना बिबटाच्या सवयी, त्याच्या हालचाली ओळखण्याच्या खुणा, तसेच बिबट दिसल्यास घ्यावयाची खबरदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मानव–वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी सामूहिक जबाबदारी, अफवांवर विश्वास न ठेवणे आणि वन विभागाशी त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी श्री सुनील शिर्के (वनपाल, ब्राम्हणवाडा), श्री सुनील कुक्कडवाल (वनरक्षक, कळंब–ब्राम्हणवाडा), श्री दीपक शिंदे (वनरक्षक, बेलापूर) तसेच इतर वन कर्मचारी उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या वतीने श्री सुभाष गायकर (उपसरपंच, ब्राम्हणवाडा) यांनी कार्यक्रमाला पाठिंबा देत ग्रामस्थांना वन विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित राहून प्रश्नोत्तरांद्वारे शंका निरसन केले. अशा जनजागृती उपक्रमांमुळे मानव–बिबट संघर्ष कमी होऊन जीवितहानी टाळण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# पुणे–नाशिक महामार्गावर गोवंश तस्करीचा पर्दाफाश

- कत्तलीसाठी कर्नाटककडे नेले जाणारे २८ बैल संगमनेर पोलिसांच्या तावडीत
- ३२ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त; चालक अटकेत

संगमनेर : (समर्थ गांवकरी)



पुणे–नाशिक महामार्गावरून कंटेनरमध्ये अत्यंत अमानुषपणे कोंडून कत्तलीसाठी कर्नाटककडे नेली जाणारी गोवंश जनावरे संगमनेर पोलिसांनी वेळीच पकडून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल २८ गोवंश जातीचे बैल व ३२ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, कंटेनर चालकाला अटक करण्यात आली आहे.

बुधवारी (दि. ३१ डिसेंबर) पहाटेच्या सुमारास उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोलीस कॉन्स्टेबल राहुल कैलास सारबंदे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, १० टायर कंटेनरमधून जनावरांची अवैध वाहतूक सुरू आहे. ही माहिती तात्काळ पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांना कळवण्यात आली. डॉ. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक बापूसाहेब हांडे, पोलीस कॉन्स्टेबल सुनील ढाकणे आदींच्या पथकाने संगमनेर–पुणे रोडवर गस्त सुरू केली. पहाटे सुमारे ४.३० वाजता हिवरगाव पावसा टोलनाक्याच्या पुढे जावळे वस्ती परिसरात नाशिक–पुणे महामार्गावर संशयास्पद अवस्थेत उभा असलेला कंटेनर (क्रमांक KA-51 B-8920) पोलिसांनी अडवला. सुरुवातीला चालकाने दिशाभूल करणारी उत्तरे दिली, मात्र सखोल चौकशीत कंटेनरमध्ये जनावरे असल्याची कबुली दिली.

कंटेनरची तपासणी केली असता, त्यामध्ये २८ गोवंश जातीचे बैल कत्तलीच्या उद्देशाने दाटीवाटीने व अत्यंत निर्दयतेने कोंडलेले आढळून आले. या जनावरांची अंदाजे किंमत १२ लाख ६० हजार रुपये, तर २० लाख रुपये किमतीचा अशोक लेलँड कंपनीचा कंटेनर असा एकूण ३२ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

याप्रकरणी कंटेनर चालक सय्यद रिजवान दस्तगीर (वय ३२, रा. होले नरसिंगपूर, जिल्हा हसन, कर्नाटक) याला ताब्यात घेण्यात आले आहे. प्राथमिक चौकशीत ही जनावरे आरबाज राजू शेख (रा. कुरण, ता. संगमनेर) यांच्या मालकीची असून ती कर्नाटक येथे कत्तलीसाठी नेली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध प्राण्यांना निर्दयतेने वागणूक देणे अधिनियम १९६० (कलम ३ व ११) तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९९५ (सुधारित कलमे) अंतर्गत संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वडझिरे मंडलाला ८७.०५ लाख मंजूर

पारनेर: (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील वडझिरे मंडलातील अतिवृष्टीमुळे पीक नुकसान झालेल्या आठ गावांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. या गावांना ८७.०५ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर झाली असून, ही रक्कम लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी ही माहिती दिली. सुजित झावरे पाटील यांनी गेल्या दीड महिन्यापासून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच ही मंजुरी मिळाली आहे. यापूर्वी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या या गावांना भरपाईपासून वंचित राहावे लागले होते, मात्र आता शेतकऱ्यांना न्याय मिळाला आहे. याशिवाय, कान्हूर पठार आणि पारनेर मंडलातील शेतकऱ्यांच्या १३.१० कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईचा प्रस्तावही लवकरच मंजूर होणार असल्याचे झावरे पाटील यांनी सांगितले. पारनेर तालुक्यात आतापर्यंत विविध मंडलांतील शेतकऱ्यांना ४४.५२ कोटी रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत.

# महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिक अंक “बांधिलकी-२०२४-२५-‘विषय-चिंतन’ या ४७ व्या अंकाचे प्रकाशन संपन्न

देवळा : (समर्थ गांवकरी)



कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा (जि. नाशिक) यांच्या वतीने महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिक बांधिलकी-२०२४-२५- ‘विषय-चिंतन’ या अंकाचे प्रकाशन समारंभ माननीय श्री.हिरामण झिरवाळ, उपजिल्हाधिकारी, मुंबई तसेच ‘जेथोड’ या चरित्रात्मक कादंबरीचे प्रसिद्ध लेखक म्हणून लाभले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हितेंद्र आहेर हे होते.सुरुवातील ‘शब्द’ या भित्तीपत्रके उद्‌घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व नियतकालिकेचे संपादक प्रा. रवींद्र पगार यांनी केले. त्यांनी ‘बांधिलकी’ या वार्षिक नियतकालिकाच्या विषय ‘चिंतन’ विशेष अंक होता. निर्मितीमागील संकल्पना व उद्देश व विद्यार्थ्यांच्या साहित्यिक सहभागाबाबत थोडक्यात माहिती दिली. तसेच पुढील अंकाचे विषय आणि प्रयोजन सांगितले. प्रमुख पाहुण्याचा परिचय महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ.जयवंत भदाणे यांनी केला.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ‘बांधिलकी’ या नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी माननीय हिरामण झिरवाळ यांनी विद्यार्थ्यांच्या साहित्यिक अभिव्यक्तीचे महत्त्व विशद करत अशा नियतकालिकांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा मिळते, तसेच वाढत्या वयाबरोबर या महाविद्यालयातील विद्यार्थी वाचन आणि लेखनाचा विचारही वाढवत आहेत याचा गौरव केला.पुस्तक वाचनातून माणूस कसा शोधावा याचा उल्लेख केला. तसेच लेखन, वाचन व सर्जनशीलतेची आवड जोपासण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रसिद्ध लेखकांनी आपल्या भाषणातून साहित्य, समाज आणि विद्यार्थ्यांची जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. नियतकालिकातील लेख, कविता व वैचारिक लिखाणाचे त्यांनी विशेष कौतुक केले. व पुढील बांधिलकी-२०२५-२६ अंक ‘मी वाचलेले पुस्तक’ या विशेषांकाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मराठवाडा मित्र मंडळ वाणिज्य महाविद्यालय पुणे येथील प्राचार्य डॉ. किशोर निकम यांनी बांधिलकी या पुस्तकाचे वाचन करून विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या प्राचार्य आणि जेष्ठ साहित्यिक डॉ.एकनाथ पगार तसेच संपादक मंडळाचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हितेंद्र आहेर उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ. एकनाथ पगार, उपप्राचार्य प्रा. डॉ. जयवंत भदाणे व डॉ. सतीश ठाकरे व बांधिलकी अंकाचे सहसंपादक उपप्राचार्य डॉ. जयवंत भदाणे, प्रा. डॉ. जयमला चंद्रात्रे, प्रा. एन.वाय. पाटील हे मान्यवर उपस्थित होते.

# ग्रामीण पत्रकारितेचा आधारस्तंभ : डॉ. विश्वासराव आरोटे

## सह्याद्रीच्या कुशीतून उभा राहिलेला निर्भीड पत्रकारितेचा वटवृक्ष!

(समर्थ गांवकरी)



श्री. नवनाथ जाधव
(प्रदेश प्रसिध्दी प्रमुख महा. रा. म. पत्रकार संघ मुंबई)

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणजे पत्रकारीता होय.! त्याची पाळंमुळं अगदी ग्रामीण भागात डोंगराच्या दरीखोऱ्यात राहणाऱ्या पत्रकारांपर्यंत रूजलेली आहेत. ते पत्रकार आहेत! मात्र, त्यांना त्यांची स्वतःची ओळख आणि न्याय देण्याचे काम कोणी करताना दिसत नाहीत. ग्रामीण पत्रकारीता राज्यभर दुर्लक्षित असताना जर त्यांना न्याय देण्याचे काम जर कोणी केले असेल तर ते विश्वसनीय नाव म्हणजे डॉ. विश्वासराव आरोटे होय.! पत्रकारीतेच्या उन्नतीचा वसा घेऊन राज्य पायाखाली घालणारा हा पत्रकारीचेचा स्तंभ गेली अनेक दशके सातत्याने न्यायासाठी झुंज देत आहे. अगदी सह्याद्रीच्या कुशित जन्मलेल्या या विश्वासू व्यक्तीमत्वाने आज पर्वताला गवसणी घातली आहे. तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघा सारख्या एका छोट्याशा रोपट्याला आज वटवृक्षात रुपांतर करण्यात आरोटे यांची अत्यंत महत्वाची भूमिका आहे.

सन 1 जानेवारी 1985 साली सह्याद्रीच्या कुशित आणि निळवंडे धरणाऱ्या मातीत रुजलेल्या चितळवेढे (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) या अगदी छोट्याशा गावात विश्वास आरोटे यांचा जन्म झाला. वडिल शेतकरी आणि घरी आठरा विश्व दारिद्र असताना हलाखीच्या परिस्थितीत आपल्या आई-वडिलांच्या संसाराला हातभार लावत त्यांनी मोठ्या कसोशिने व जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण केले. आई एका शाळेवर स्वयंपाकी म्हणून आयुष्याचे चटके खात होती, तर तिच्या हातावरी फोड पाहून भरल्या डोळ्यांनी विश्वास त्याच शाळेत शिक्षण घेत होते. त्याकाळी फारसा रोजगार नव्हता, आज प्रमाणे हव्या तशा सेवा सुविधा नव्हत्या. त्यामुळे, मिळेल ते काम आरोटे यांनी मोठ्या विश्वासाने केले. आयुष्याच्या वर्तुळरुपी परिघावर जगत असताना त्यांनी अनेक अडचणी सोसल्या. मात्र, कितीही विपरीत परिस्थिती आली तरी त्यांनी रणांगण सोडले नाही. म्हणून तर ते जगाच्या विश्वासास पात्र ठरले.

आई.! मी लात मारीन तेथे पाणी काढीन.! तु घाबरू नकोस, असे छाती ठोकून सांगणाऱ्या य धडपड्या वृत्तीमुळे त्यांना एका पतसंस्थेत शिपायाची नोकरी लागली. तेव्हा, तो आनंद त्यांच्या गगनात मावेनासा झाला होता. मात्र, त्यांची धेय्यशक्ती इतकी बुलंद होती. की, या व्यतिरिक्त आपल्याला कोठे आणि काय संधी मिळेल यासाठी ते सतत प्रयत्नशिल होते. एक शेतकरी सुपूत्र म्हणून त्यांनी दूध विक्री सुरू केली. जे काम करायचे ते अगदी प्रमाणिकपणे.! त्यामुळे, त्यात अपयश आले तरी बेहत्तर, मात्र खचायचे नाही. या धेय्याने पछाडलेला हा तरुण प्रत्येक वेळी आयुष्याच्या प्रत्येक वळणावर स्वतःला सिद्ध करीत राहीला. त्यांच्या अंगात इतके चैतन्य होते की, एकाच वेळी अनेक काम करुन आपल्या कुटुंबाला आपली मदत कशी होईल यासाठी ते अविरत प्रयत्न करीत होते.

या दरम्यानच्या काळात म्हणजे सन 1999 साली त्यांनी हमालीची नोकरी आणि त्यानंतर वर्तमानपत्र विक्रीचे काम सुरु केले. तेव्हा खऱ्या अर्थाने त्यांच्या आयुष्यात पत्रकारीतेचे रोपटे रुजले गेले. बोलबोल करता नावाप्रमाणे त्यांनी अनेकांच्या मनावर अधिराज्य गाजवत जनमानसांचा विश्वास संपादन केला. त्यांची पत्रकारीतेत नव्याने ओळख निर्माण झाली. जे कोणी स्वतःला पत्रकार म्हणून घेतात त्यांच्या तुलनेत आपण देखील चांगले लिखाण करु शकतो अशा प्रकारची एक आत्मिक भावना त्यांच्या मनाला वारंवार छेडत होती. तेव्हा खऱ्या अर्थाने त्यांच्यातील पत्रकारीनेने जन्म घेतला आणि सुरू झाली पत्रकारीतेतील चळवळ.!

ग्रामीण भागातील लोकांना न्याय देऊन त्यांच्यापर्यंत वृत्तपत्र पोहचवायचे असेल तर त्या वृत्तपत्रात ग्रामीण भागातल्याच समस्या मांडल्या पाहिजेत. या अजेंड्याखाली त्यांनी लेखनातून व्यक्त होण्यास सुरु केली. दरम्यान, त्याकाळी म्हणजे सन 2000 साली पत्रकारीतेत नव्याने पाय रोवने वाटते तितके सोपे नव्हते. कारण, प्रस्तापितांच्या मर्मावर बोट ठेवले तर त्यांना तो व्यक्ती अगदी डोईजड वाटत असे. त्यात विश्वासराव यांचा स्वभाव नितळ, निर्मळ आणि प्रांजळ त्यामुळे, जे मनात तेच ओठात आणि ते ओठात तेच लेखात. त्यामुळे, त्यांना पत्रकारीतेत पाय रोवताना प्रचंड अडचणी आल्या. आता काल ज्याची विश्वास म्हणून ओळख होती, त्यांचे नामकरण विश्वासराव यात झाले होते. ही राव उपाधी मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करीत अनेक परिक्षा द्याव्या लागल्या होत्या. मात्र, जेथे निर्भिड पत्रकारीतेच्या अस्मितेचा प्रश्न उभा राहिल, तेथे विश्वासराव यांनी कधीही तत्वांशी तडजोड केली नाही. पत्रकारीतेत त्यांनी राजकीय अथवा स्वहिताला प्राधान्य न देता निर्भिड लेखन सुरु ठेवले आणि हिच प्रतिमा त्यांना मोठ्या पदावर घेऊन गेली.

सन 1999 पासून वृत्तपत्राच्या सानिध्यात सुरू झालेला हा प्रवास उत्तरोत्तर वाढत गेला. या दरम्यान त्यांनी वार्ताहर म्हणून अनेक वृत्तपत्रांमध्ये काम केले. एक तालुका प्रतिनिधी ते विभागीय कार्यालयाचे उपसंपादक म्हणून त्यांनी दैनिक गांवकरी या उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिकाची जबाबदारी यशस्वीरीत्या स्वतःच्या खांद्यावर पेलली. गांवकरीच्या माध्यमातून ग्रामीण भागाची, या भागातील ग्रामस्थांची विश्वासाईता जपली. त्यांचे प्रश्न आपल्या लेखनीच्या माध्यमातून सातत्याने मांडले. पत्रकारीता करत असतानाच ग्रामीण भागातील पत्रकारांशी देखील त्यांची नाळ जोडली गेली. अन्याय येथे विश्वास असे एक समिकरणच होऊन गेले. आवाज दिला तेथे विश्वासराव हजर अशा प्रकारची त्यांची ओळख निर्माण झाली. त्यामुळे, त्यांच्या सानिध्यात असणाऱ्या अनेकांना राज्य मराठी पत्रकार संघाविषयी आत्मियता वाटू लागली.

बोलबोल करता त्यांच्या 25 वर्षाच्या प्रदिर्घ कालखंडात त्यांच्याभोवती प्रचंड मोठा गोतावळा निर्माण झाला आहे. विशेषतः राज्यातील ग्रामीण भागात काम करणाऱ्या पत्रकारांची मोट त्यांनी बांधली. अकोले तालुक्याच्या बरोबरच राज्यातील विविध ठिकाणी सर्वांना बरोबर घेऊन वेगवेगळ्या ठिकाणी ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना केली. या पत्रकार संघाच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांसाठी खऱ्या अर्थाने कार्य सुरु केले. हे काम करत असतानाच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजयजी भोकरे या कर्तुत्वान दिपस्तभाशी संपर्क आला. एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या म्हणीप्रमाणे हे दोन्ही ध्येयवेडे एकाच स्वप्नाने पछाडलेले होते. भान ठेऊन नियोजन करायचे आणि बेभान होऊन काम करायचे अशा उदिष्ट्य डोळ्यासमोर ठेऊन संपुर्ण राज्य त्यांनी पिंजून काढले. पत्रकारांच्या वेगवेगळ्या समस्या सातत्याने मांडून त्यासाठी राज्यस्तरावर नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करुन प्रश्न तडिस नेण्याचे यशस्वी काम त्यांनी केले.

यावेळी, पत्रकारांसाठी राज्यस्तरीय अधिवेशने, जिल्ह्यात, तालुक्यात विविध मेळावे, राज्यभरातील सर्व पत्रकारांना पत्रकार संघात सामावून घेणे, पत्रकारांचा विमा काढणे, प्रत्येक परिस्थितीत त्यांच्या पाठीशी खंबिरपणे उभे राहणे, त्यांना लढ म्हणणे असे अनेक उपक्रम आरोटे यांनी अगदी निःस्वार्थीपणे राबविले.

त्याच्या कार्याची दखल घेत संघटनेने त्यांना अहिल्यानगर जिल्ह्याध्यक्ष आणि नंतर राज्य सरचिटणीस या पदावर काम करण्याची संधी दिली. या विश्वासास पत्र ठरताना त्यांनी पत्रकार संघाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांबरोबरच क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणवंतांचा राज्यस्तरावर गौरव केला. आर्थिक दृष्ट्या कमकुसत असणाऱ्या पत्रकारांना औषधोपचार व इतर गरजा भागविण्यासाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून आर्थिक मदत केली. पत्रकारीतेचे प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रपती ते राज्याचे आजी माजी मुख्यमंत्री यांच्यासह शरद पवार आणि अनेक मंत्र्यांकडे त्यांनी पाठपुरावा केला. पत्रकारांना संरक्षण मिळावे, संरक्षण कायदा व्हावा यासाठी ते नेहमीच आग्रही राहीले. पत्रकारांवर होणार्या हल्ल्यांचा निषेध करत आरोपींना अटक होईपर्यंत त्यांनी पाठपुरावा केला. ग्रामीण भागातील पत्रकारांनाही श्रमिक पत्रकारांप्रमाणेच ॲक्रीडीशन कार्ड मिळावे, एस.टी. बस तसेच रेल्वेसारख्या विविध सवलती मिळाव्यात, शासनाने त्यांचा आरोग्य विमा काढावा, पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती द्याव्यात, पत्रकारांना निवासासी व्यवस्था उपलब्ध करावी या व अशा अनेक मागण्यांसाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रामाणिक प्रयत्न विश्वासराव आरोटे करत आहेत.

या कामाला येथेच पुर्णविराम मिळाला नाही. तर उत्तर महाराष्ट्राबरोबरच मराठवाडा आणि विदर्भातही पत्रकारांची मोट बांधून त्यांना एका व्यासपिठावर आणण्याचे काम डॉ. विश्वासराव आरोटे यांनी खर्या अर्थाने केले आहे. त्यामुळे शासनाकडून जरी या चौथ्या स्तंभाला संरक्षण मिळत नसले तरी पत्रकार संघटना भक्कमपणे पत्रकारांच्या पाठीशी उभी आहे. त्यांच्यावरील अन्यायाला तोंड देण्यासाठी सक्षम आहे असा विश्वास पत्रकारांच्या मनात निर्माण करण्यासाठी विश्वासराव आरोटे यांनी अथक परिश्रम घेतले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना आजवर शासनाचा यशवंतराव चव्हाण पत्रकारीता पुरस्कार तसेच विविध पुरस्कार मान्यवरांच्याहस्ते प्राप्त झाले आहेत. अर्थातच पत्रकारीचेची ज्योत प्रज्वलित ठेवणाऱ्या य व्यक्तीमत्वास उदंड आयुष्य लाभो. विशेष म्हणजे शौर्यदिनाच्या दिवशी सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेल्या या व्यक्तीमत्वाने अशक्य अशा कोविड वर मोठ्या कठीण परिस्थितीत मात केली आहे. त्यामुळे, 1 जानेवारीला पुन्हा जन्म घेणाऱ्या या पत्रकारीतेच्या आधारस्तंभास लक्ष लक्ष शुभेच्छा.!

# शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न




**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट बेल्हे येथे नुकतेच ३ दिवसीय शिक्षक-प्रशिक्षण (फॅकल्टी डेव्हलपमेंट) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.राजेंद्रसिंह परदेशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून मान्यवरांच्या उपस्थितीत या तीन दिवसीय कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सकाळच्या सत्रात डॉ.राजेंद्रसिंह परदेशी यांनी "इफेक्टिव्ह टिचिंग मेथडॉलॉजी अँड मोटिवेशनल स्पीच" या विषयावर मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रामध्ये अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी शिक्षण क्षेत्रातील व्यावसायिक नितीमूल्ये या बाबतचे महत्व विशद केले. अभ्यासक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी,शैक्षणिक लवचिकता,अभ्यासक्रम आणि फीडबॅक पद्धती,शैक्षणिक प्रक्रिया,गुणवत्ता,मूल्यमापन प्रक्रिया आणि सुधारणा,नवकल्पना आणि संशोधन संस्कृती' वाढवण्यासाठी संस्थेने दिलेल्या सुविधा यासंदर्भात मार्गदर्शन केले.त्यानंतर कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढ आणि तणाव व्यवस्थापन या दोन्हीचा कसा समतोल साधायचा याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. कुलदीप रामटेके यांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांची मानसिकता याबाबत सविस्तर चर्चात्मक संवाद साधला.डॉ. महेश भास्कर यांनी प्रभावी अध्यापनासाठी आधुनिक पद्धतीने अध्यापन कसे करावे तसेच माहिती तंत्रज्ञानाचे प्रभावी अध्यापनासाठीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.डॉ.शरद पारखे यांनी अध्यापन अध्ययन पद्धती तंत्र आणि संशोधन याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,अभियांत्रिकेचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,बीसीएस चे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,डॉ.लक्ष्मण घोलप,समर्थ इन्स्टिट्यट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके,समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.संतोष घुले,प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदिप गाडेकर,समर्थ गुरुकुल चे प्राचार्य सतीश कुऱ्हे,क्रीडा संचालक एच पी नरसुडे व संकुलातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेकॅनिकल विभागप्रमुख प्रा.अमोल खतोडे व प्रा. निर्मल कोठारी यांनी या कार्यक्रमाचा अभिप्राय घेऊन उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन वाहनावर महसूल पथकाची कारवाई

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**




बिलोली तालुक्यात सद्यस्थीत महसूल विभागाकडून रेती उत्खननाचा करण्याचा कुठलाही परवाना नसताना तालुक्यातील मौ. येसगी, हुनगुंदा, सगरोळी येथील मांजरा नदीपत्रातुन रात्रीला मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैध उपसा केल्या जात आहे, यादरम्यान महसूल पाथकाने ( दि. २९) डिसेंबरच्या मध्ये रात्री कार्ला फाटा व सगरोळी रोडवर अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या हायवा व ट्रकला पकडून पुढील कारवाईसाठी तहसील कार्यालयात लावण्यात आले आहे.

वरिष्ठ अधिकारी नांदेड महानगर पालिका निवडणूकीच्या कामात मग्न असल्याचा फायदा घेऊन येथील स्थानिकच्या रेती माफियांनी काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून तालुक्यात महसूल विभागाचा कसलाही परवाना नसताना स्थानिक प्रशासनाच्या मूक संमतीने येसगी, हुंगूनदा, सगरोळी येथील मांजरा नदीपत्रातून दररोज रात्रीला अनेक ट्रॅक्टर द्वारे रेतीचा अवैध रित्या उपसा करून जमेल त्या ठिकाणी साठा जमून अनेक हायवा व ट्रकच्या सह्याने इतर राज्यात अवैध वाहतूक केली जाते, या प्रकारा बद्दल अनेक तक्रारी वाढल्याने वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशाने महसूल विभागाच्या पथकातील अनिल धुळगंडे मंडळ अधिकारी सगरोळी,मअ चंद्रकांत सगरोळी, चौडम, मअ. येसगी ,अनिल देवापुरे मअ कार्ला( बु),बिरप्पा लोणीकर मसे. यांनी सोमवारी रात्रीला सापळा रचून कार्ला फाटा येथे रेतीने भरलेला एमएच १२ एचडी २५०५ क्रमांकचा हायवा तर याच प्रमाणे सगरोळी रोड हिप्परगा येथे रेतीची वाहतूक करणारा एपी २१ टी वाय ४६०८ क्रमांकचा ट्रक पकडून महसूली पंचनाम्या नंतर पोलीस प्रशासनाच्या मदतीने दोनीही वाहन पुढील कारवाईस बिलोली तहसिल कार्यालयात लावण्यात आले आहे.

## ठाणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तक्रार निवारण कक्ष व स्वतंत्र हेल्पलाईन सुरु

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




आगामी ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व नियमबद्ध रितीने पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. निवडणुकीदरम्यान उद्भवणाऱ्या विविध तक्रारींचे तात्काळ निवारण व्हावे, या उद्देशाने हा कक्ष सुरू करण्यात आला असून नागरिकांनी +91 91528 17252 दूरध्वनी क्रमांकावर किंवा tmcelectiongrievance@thanecity.gov.in ई-मेलवर संपर्क साधावा असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी केले आहे. निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन, बेकायदेशीर प्रचार, भिंतींवर पोस्टर्स-बॅनर्स लावणे, मतदारांवर दबाव, पैशांचा किंवा वस्तूंचा गैरवापर, खोटी माहिती पसरवणे, मतदान प्रक्रियेशी संबंधित अडचणी, तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांविषयीच्या तक्रारी याबाबत नागरिक या तक्रार निवारण कक्षात संपर्क करू शकतात. प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची नोंद घेऊन त्यावर तातडीने चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. तक्रार निवारण कक्षात प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून संबंधित विभाग, क्षेत्रीय अधिकारी, पोलीस प्रशासन व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी समन्वय साधून तक्रारींचे वेळेत निराकरण केले जाणार आहे. तक्रार करणाऱ्या नागरिकांची माहिती गोपनीय ठेवली जाणार असून नागरिकांनी निर्भयपणे तक्रारी नोंदवाव्यात, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## राजेंद्र शिंदे राष्ट्रीय ज्ञानयज्ञ कला भूषण पुरस्काराने सन्मानित

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्याचे भूषण उदापूर गावचे सुपुत्र कु राजेंद्र लक्ष्मण शिंदे यांना कवी सरकार वाचन मंदिर आयोजीत २६ वे मराठी साहित्य संमेलन कोल्हापूर येथे "राष्ट्रीय ज्ञानयज्ञ कला भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.सुप्रसिद्ध निवेदक, होम मिनिस्टर फेम आणि फिल्म कलाकार,वारकरी संप्रदायात विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्टकामगिरी म्हणून त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. उदापुर ग्रामस्थ व जुन्नर तालुक्याच्या सर्व मित्र परिवाराच्या वतीने त्यांचे खूप खूप अभिनंदन वर्षाव होत आहे यावेळी त्यांचे सोबत शिवसेना शिंदे गटाचे जुन्नर तालुका अध्यक्ष विकास राऊत,स्वप्निल आहिनवे आणि रोहिदास अमुप उपस्थित होते.

## समर्थ गुरुकुलमध्ये 'आनंद बाजार ' उत्साहात संपन्न

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यट संचलित,समर्थ गुरुकुल बेल्हे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नुकताच आयोजित करण्यात आलेला 'आनंद बाजार' हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या आनंद बाजाराचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलताई शेळके यांच्या हस्ते करण्यात आले.



मी आणीन- मी मांडीन-आणि मी विक्री करीन अशा प्रकारची टॅगलाईन विद्यार्थ्यांसाठी देण्यात आलेली होती.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेल्या खाद्यपदार्थांचे,हस्तकलेच्या वस्तूंचे तसेच विविध उपयुक्त वस्तूंचे स्टॉल उभारले होते.

काय होता मेळाव्याचा हेतू- मुलांना स्वत:च्या प्रयत्नातून काही तयार करून त्याची किंमत समजणे,विक्री-खरेदीचा प्रत्यक्ष अनुभव मिळवणे,आत्म विश्वास,संवाद,सर्जनशीलता आणि जबाबदारी वाढवणे.

आनंदमेळाव्याची वैशिष्ट्ये- वस्तूंची विक्री करतील,जसे की,कडधान्याचे पदार्थ,पालेभाज्यांची माहिती,आरोग्यदायी स्नॅक्स,छोटी हस्तकला, क्राफ्ट्स इत्यादी,शिक्षक आणि इतर विद्यार्थी हेच वस्तू विकत घेतील,यातून मुलांना पैशांचीदेवाण-घेवाण,व्यवहार ,संवादकौशल्य,आत्मविश्वास आणि जबाबदारी शिकता येईल.

मुलांना छोट्या व्यापाऱ्यासारखे काम करण्याची,किमती ठरवण्याची,ग्राहकांशी बोलण्याची आणि वस्तू सादर करण्याची संधी.या आनंद बाजाराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता,आर्थिक व्यवहाराचे ज्ञान,आत्मविश्वास,संघभावना व जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा उद्देश साध्य करण्यात आला.विद्यार्थ्यांनी ग्राहकांशी संवाद साधत विक्री,खरेदी,नफा-तोटा यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.वेळेवर कमी पडलेले साहित्य आणि त्यावर स्वतःच्या बुद्धीने तसेच ऐनवेळी घेण्यात आलेले निर्णय क्षमता याचे धडे विद्यार्थ्यांना मिळाले.या आनंद बाजारामध्ये लाखो रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती प्राचार्य सतीश कुऱ्हे यांनी दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेच्या व्यवस्थापनाने शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. आनंद बाजार म्हणजे विद्यार्थ्यांना व्यवहारातून मिळालेल्या कौशल्य व कल्पकतेचा संगम असल्याचे मत माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके यांनी व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके सर,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर,संकुलातील सर्व विभागाचे प्राचार्य,विभागप्रमुख, शिक्षकवृंद,पालक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## दुध टँकर व पिकअप भीषण टक्कर दोन महिला ठार

- ३१ जण जखमी, अहिल्यानगर कल्याण महामार्गावरील घटना

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



आहिल्यानगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावर डुंबरवाडी जवळच मंगळवार, दि:-३० डिसेंबर रोजी सकाळी पिकअप व दूध टँकरची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात पिकअप मधील दोन महिला शेतमजूर ठार झाल्या असून अंदाजे ३५ ते ३८ जण जखमी झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

अधिक माहिती अशी की, बनकरफाटा येथु आळेफाटाच्या दिशेने शेतमजूर घेऊन जाणारी पिकअप गाडी नंबर एमएच १६ सिडी ८१५५ व कल्याणच्या दिशेने येणारा दूध टँकर नंबर एमएच १२ एक्स एम ६१२१ यांची डुंबरवाडी येथील अभिजीत हॉटेल जवळ समोरा समोर धडक झाली. या धडकेत पिकअपचा चालक व त्यातील शेतमजूर मोठ्या प्रमाणात जखमी झाले. दूध टँकर चालकालाही गंभीर दुखापत झाली आहे. अपघाता नंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमींना ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. त्यानंतर काही जखमींना आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात तसेच मंचर येथील आरोग्य केंद्रात पुढील उपचारा साठी हलविण्यात आले. या अपघातात पिकअपमधील वंदना गणेश हिल्लम(वय २०) रा:-खुट्ल ता:- मुरबाड जि:-ठाणे व मंदा शिवराम हिल्लम (वय ३५) रा:-तळेगाव, ता:-मुरबाड, जि:-ठाणे यांचा मृत्यू झाला तर ओतूर,बगाडवाडी,अकोले, पाचघर,निमगिरी,लव्हाळी, टोकवडा,फोफसंडी,मांडवे, बल्लाळवाडी येथील एकूण २६ महिला पुरुषांनी ओतूर प्राथमिक केंद्रात प्राथमिक उपचार केले अशी माहिती ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ.श्रीहरी सरोक्ते,प्रशांत गोरे यांनी दिली.

अपघातानंतर काही काळ महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलीस स्टेशन घटनास्थळी धाव घेत सुरळीत केली.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस करीत आहेत.

## जिल्हा परिषद शाळेचे विज्ञान प्रदर्शनात दुहेरी यश

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

तामसा येथील पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक व प्राथमिक गटात प्रथम क्रमांक पटकावीत दुहेरी यश संपादन केले आहे. हदगाव येथील विवेकानंद विद्यालयात ५३ व्या विज्ञान प्रदर्शनात प्रशालेच्या नववी वर्गातील प्रीती वास्कर, समृद्धी शिंदे या विद्यार्थिनींनी माध्यमिक गटात सादर केलेला "स्मार्ट फार्म ७- एक्स" हा प्रयोग अव्वल ठरला. प्रशालेच्या आठव्या वर्गातील गार्गी धरमुरे, श्रीशा कऊटकर, अक्षरा कल्याणकर या विद्यार्थिनींचा प्राथमिक गटातील "एक्वाफोनिक फार्मिंग" हा प्रयोग प्रथम ठरला. या विद्यार्थिनींना शिक्षिका रंजना रापतवार, स्मिता थूकुरवार यांनी मार्गदर्शन केले. दोन्ही प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

## दिव्यातील शिवसेनेच्या उमेदवारांचे मोठ्या जल्लोषात उमेदवारी अर्ज दाखल

**ठाणे,दिवा : (समर्थ गांवकरी)**



ठाणे महानगर पालिका सार्वत्रिक निवडूक २०२६ मधील दिव्यातील शिंदे गटाच्या शिवसेनेच्या अधिकृत उमेदवारांचे मोठ्या जल्लोषात शक्ती प्रदर्शन करून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. दिवा प्रभाग समितीच्या प्रभाग क्र २७ मधील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार म्हणून उपशहर प्रमुख शैलेश मनोहर पाटील, दीपाली उमेश भगत, स्नेहा अमर पाटील व ऍड. आदेश कमलाकर भगत यांनी आपला उमेदवारी अर्ज भरला असून दिवा प्रभाग समितीच्या प्रभाग क्र. २८ मधील शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी,

दर्शना चरणदास म्हात्रे, दीपक जाधव व साक्षी रमाकांत मढवी यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. तसेच प्रभाग क्र. २९ मधून दिव्यातील अर्चना निलेश पाटील यांनी देखील मोठ्या उत्साहात आपले शक्तीप्रदर्शन करत शिवसेनेचे अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला असून बाबाजी पाटील व आकाश बाबाजी पाटील यांनी देखील आपला उमेदवारी अर्ज प्रभाग २९ मधून भरला आहे. प्रसंगी उमेदवारी अर्ज दाखल करताना शिवसेनेच्या संघटन शक्तीचा, कार्यकर्त्यांच्या जिद्दीचा आणि जनतेच्या विश्वासाचा भक्कम आधार अनुभवायला मिळाला असे रमाकांत मढवी यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केल आहे.

## पद्मभूषण डॉ. विखे पाटील यांची पुण्यतिथी साजरी

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील भूतेटाकळी येथील प्रवरा माध्यमिक विद्यालयात दि. ३० डिसेंबर रोजी पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांची नववी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून श्री. दत्तात्रय वारकड हे होते. यावेळी शाळा समिती अध्यक्ष कुमारभाऊ फुंदे, सदस्य भाऊसाहेब फुंदे, बाबासाहेब फुंदे, नारायण फुंदे, म्हातारदेव फुंदे, संभाजी फुंदे, दादासाहेब फुंदे, सोमनाथ गिरी, गोरक्ष गिरी उपस्थित होते. या प्रसंगी व्याख्याते वारकड यांनी पद्मभूषण यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला आणि मूल्यशिक्षण आणि आनंदी जीवन या वर सुंदर व्याख्यान दिले. वैष्णवी फुंदे, भाग्यश्री फुंदे, सुवर्णा केदार, आदिती फुंदे या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट भाषणे केली.

मुख्याध्यापक पठाण आसिफ यांनी यथोचित पाहुण्यांचा सत्कार केला आणि पद्मभूषण यांचे कार्य येणाऱ्या पिढ्यासाठी नेहमीच प्रेरणादायी आहे, असे मनोगत व्यक्त केले.

प्रास्तविक बाळासाहेब फुंदे तर आभार बंडोपंत गोडगे यांनी मानले. विद्यार्थ्यांना अल्पपोहार देण्यात आला.

यावेळी टाकळकर अजिनाथ, अशोक भगत, खुडे लक्ष्मण, सांबारे धनंजय, खेडकर अशोक, फुंदे वाल्मिक आदी उपस्थित होते.

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर तेजेवाडी येथे उत्साहात संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



शाश्वत विकासासाठी युवकांची भूमिका अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे,श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर आयोजित 'शाश्वत विकासासाठी युवक:पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन' या उपक्रमा अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर गुरुवार दि:-१८ डिसेंबर ते २४ डिसेंबर ०२५या दरम्यान मु.पो. तेजेवाडी ता:-जुन्नर या गावात नुकतेच यशस्वीरित्या पार पडले.

शिबिराचे उद्घाटन अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.व्ही.बी.कुलकर्णी व कार्यालय प्रबंधक मनिषा कोरे यांच्या उपस्थितीत संस्थेचे विश्वस्थ अनिल जोगळेकर यांच्या हस्ते पार पडला.समाज सेवा व राष्ट्रसेवा राष्ट्रीय सेवा योजनेचा अविभाज्य भाग असल्याचे या प्रसंगी उदबोधन जोगळेकर यांनी केले.उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव वाघमारे यांनी भूषविले. या वेळी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवायोजने चा वसा आणि वारसा प्राचार्यांनी सांगितला. सदर कार्यक्रमात तेजवाडी गावचे सरपंच संपत नायकोडी, उपसरपंच राजेश विश्वासराव,गावातील विविधसंस्थांचे पदधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.महेंद्र कोरडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिबिरात विविध व्याख्यानमाला,लाठीकाठी प्रशिक्षण,बौद्धिक खेळ,गटचर्चा,योगा,सूर्यनमस्कार व प्राणायाम यांसारखे अनेक उपक्रम घेण्यात आले.शिबिरास विविध मान्यवरांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.व्याख्यानमालेत सायबर सुरक्षा व जनजागृती शाश्वत, विकासासाठी युवक,भारतीय संविधान व माझी जबाबदारी, सामाजिक जडणघडणीत युवकांची भूमिका,पाणलोट विकास व पडीक जमीन व्यवस्थापन या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.शिबिर श्रमसंस्कार दरम्यान स्वयंसेवकांकडून तीन कि.मी. गावातील प्रमुख रस्त्याच्या दुतर्फा २४० चिंच,शंकासुर व बकुळ या झाडांची लागवड करण्यात आली.तसेच गावातील गायरान जमिनीवर एकूण १०७५ फूट लांब समतल चर खोदण्यात आले. ओढ्याचे पाणी अडवण्यासाठी नाला खोलीकरण, दगड-मातीत १ भक्कम बंधारा तर एका गॅबीयन बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यात आली. एकूण अंदाजे १४ लाख रुपयाचे काम स्वयंसेवकांनी केल्याचे उद्गार ग्रामस्थांनी केले.

शिबिराच्या समारोप समारंभ प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीशेठ मुरलीधर काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.स्वयंसेवकांच्या कामाचे कौतुक करताना शाश्वत विकासात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.पत्रकार धर्मेंद्र कोरे यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून सुधाकर घोडेकर लिखित "ग्रीष्म आणि वसंत" या पुस्तकाचे सर्व स्वयंसेवकांना वाटप केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. महादेव वाघमारे होते तर अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.व्ही.बी.कुलकर्णी, कार्यालय प्रबंधक सौ.मनीषा कोरे तसेच सरपंच, उपसरपंच प्रशासकीय अधिकारी, विविध क्षेत्रातील पदधिकारी,ग्रामस्थ या प्रसंगी उपस्थित होते. ग्रामस्थांनी आपल्या भाषणात बोलतानास्वयंसेवकांनी केलेले काम हे चांगले,समाधानकारक व गावउपयोगी असल्याचे सांगितले. शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ महादेव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ.महेंद्र कोरडे, डॉ.सुप्रिया काळे, प्रा. विष्णू घोडे,प्रा.जयश्री कणसे, प्रा.मयूर चव्हाण यांनी केले. या शिबिरासाठी जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड.संजय शिवाजीराव काळे यांनी शुभेच्छा दिल्या, तर अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.विलास कुलकर्णी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले.

# शेतकऱ्यांना न्याय : आ. काशिनाथ दाते सर

## ८ गावांना ८७.०५ लाखांची अतिवृष्टी नुकसानभरपाई मंजूर

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५ पारनेर तालुक्यातील वडझिरे मंडलातील अतिवृष्टीमुळे नुकसान होऊनही आतापर्यंत नुकसानभरपाईपासून वंचित राहिलेल्या आठ गावांना अखेर दिलासा मिळाला असून या गावांसाठी ८७.०५ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. ही माहिती पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

वडझिरे मंडलातील शेरी कोलदरा, चिंचोली, पिंप्री जलसेन, वडझिरे, लोणी मावळा, जाधववाडी, बाभूळवाडे व पाडळी दर्या ही गावे अतिवृष्टीच्या नुकसानभरपाईपासून वंचित राहिली होती. या



शेतकऱ्यांच्या न्याय्य मागणीसाठी आमदार दाते सर यांनी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील, कृषी मंत्री दत्तामामा भरणे, जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी पाठपुरावा करत शासन दरबारी सातत्याने आवाज उठविला होता.

सबंधित पाठपुराव्याची दखल घेत ही मागणी मंजूर करण्यात आली आहे. यासोबतच कान्हूर पठार व पारनेर मंडलातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या १३.१० कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईचा प्रस्ताव सध्या प्रलंबित असून तोही लवकरच मंजूर होणार आहे, अशी माहिती आमदार दाते सर यांनी दिली. तालुक्यातील सुपा, वाडेगव्हाण, पळवे, जवळा, निघोज, पळशी, टाकळी ढोकेश्वर, भाळवणी, अळकुटी व वडझिरे मंडलाचा काही भाग मिळून आतापर्यंत ४४.५२ कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आले आहेत. आता उर्वरित वडझिरे मंडलासाठी मंजूर झालेले ८७.०५ लाख रुपये लवकरच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार असून पारनेर व कान्हूर पठार मंडलातील शेतकऱ्यांनाही लवकरच दिलासा मिळणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत तसेच भाजप राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ दादा कोरडे यांनीही सातत्याने पाठपुरावा केल्याचे आमदार दाते सर यांनी नमूद केले. आमदार दाते सरांच्या या प्रभावी पाठपुराव्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

> “अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या एकाही शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये, ही माझी ठाम भूमिका आहे. वडझिरे मंडलातील वंचित गावांना मंजुरी मिळाली असून ही रक्कम लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल. कान्हूर पठार व पारनेर मंडलातील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठीचा प्रस्तावही अंतिम टप्प्यात असून तो मंजूर होईपर्यंत मी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करणार आहे. शेतकरी हा तालुक्याचा कणा आहे, त्याच्या हक्काची मदत मिळवून देणे हे माझे कर्तव्य आहे.”
>
> **- आमदार काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

# पाच हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्ण




**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर ता:-जुन्नर,जि:-पुणे येथील गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे आश्रमामध्ये डिसेंट फाउंडेशन पुणे शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले.या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या शिबिरात एकूण १८० नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ७१ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पिटल पनवेल येथे पाठविण्यात आले.

गेल्या दोन वर्षांत डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यात पाच हजार मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा टप्पा पूर्ण झाला असून सर्व शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत.शिबिरात रुग्णांना तपासणी,मोतीबिंदू शस्त्रक्रिया,प्रवास,निवास, जेवण,चष्मा व एक महिन्यांची औषधे या सर्व सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच तिरळेपणावरील शस्त्रक्रिया देखील मोफत करण्यात येतात, अशी माहिती डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक श्री. जितेंद्र बिडवई यांनी दिली.

या शिबिराचे उदघाटन जुन्नर पोलीस स्टेशन चे अनिल लोहकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले याप्रसंगी डिसेंट फाऊंडेशनचे सचिव डॉ.एफ. बी.आतार, संचालक आदिनाथ चव्हाण,गणेश मेहेर , सत्यवान खंडागळे,शेखर जाधव,साहील बिडवई, सुजल बिडवई,समन्वयक योगेश वाघचौरे,शंकरा आय हॉस्पिटलचे समन्वयक विजय बामणे ,तज्ञ डॉक्टर व त्यांची संपूर्ण टीम व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकविरा कृषी सेवा केंद्राला भीषण आग

**देवळा : (समर्थ गांवकरी)**

देवळा तालुक्यातील मटाने भऊर फाटा चौफुलीवर असलेल्या शॉपिंग कॉम्प्लेक्समधील एकविरा कृषी सेवा केंद्र या दुकानाला दि. ३०/१२/२०२५ रोजी रात्रीच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना घडली. थंडीच्या कडाक्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिक रात्री झोपेत असल्याने ही आग पहाटे उशिरा लक्षात आली.

पहाटे साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास शेजारील शेतकरी बापू आहेर यांच्या निदर्शनास दुकानाच्या मागील बाजूच्या खिडकीतून मोठ्या प्रमाणात धूर निघताना आला. त्यांनी तात्काळ ही बाब दुकान चालक बिरारी यांना कळवली. दुकानमालक घटनास्थळी येईपर्यंत दुकानातील कीटकनाशके, खतसामग्री व इतर कृषी औषधे आगीत जळून खाक झाली होती.




सदर शॉपिंग कॉम्प्लेक्समधील हे पहिले क्रमांकाचे दुकान असल्याने सुदैवाने आगीचा इतर दुकानांवर कोणताही परिणाम झाला नाही. मात्र, एकविरा कृषी सेवा केंद्रात सुमारे २५ लाख रुपयांचा माल साठवलेला असून, या आगीत अंदाजे १० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती दुकान चालक बिरारी यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

घटनेची माहिती मिळताच तालुका कृषी अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तालुक्यात अलीकडे शॉर्टसर्किटच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने महावितरण कंपनीने विद्युत यंत्रणेकडे विशेष लक्ष द्यावे, तसेच मीटर व वायरिंगची वेळोवेळी तपासणी करावी, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

या घटनेमुळे परिसरातील व्यापारी व शेतकरी वर्गात चिंता व्यक्त करण्यात येत असून, भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी विद्युत सुरक्षेच्या उपाययोजना अधिक कडक करण्याची मागणी होत आहे.

# भव्य हनुमान कथा (चरित्र) आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

वैष्णवी भजनी मंडळ अहिल्यानगरच्या वतीने खाकीदास बाबा मठात दिनांक ३ ते ७ जानेवारी रोजी दुपारी दोन ते सहा वाजेपर्यंत गौडीया वैष्णवाचार्य श्री युगलशरणजी महाराज यांच्या सुमुधर वाणीतून श्री हनुमान कथा ( चरित्र ) वाचनाचे आयोजन केले आहे. या कथेदरम्यान प्रभू श्रीरामांचे परमभक्त हनुमानजी यांच्या जीवनातील शौर्य,भक्ती, सेवा व निष्ठेचे प्रेरणादायी प्रसंग कथारूपाने सादर केले जाणार आहेत. या कार्यक्रमात भजन,कीर्तन व कथासमाप्तीला महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे. हनुमान कथा दरम्यान दिनांक ३ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता लाल टाकी परिसरातून शोभायात्रा काढण्यात येणार आहे तसेच दिनांक ७ जानेवारी रोजी कथा समाप्तीनंतर दुपारी साडेबारा नंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

# अकोल्याच्या अतिदुर्गम भागात 'डिजिटल' क्रांती

- पेठेची वाडी व पाचनई शाळेला 'अल्केजन' व 'राईड्स' चा आधार

**गणोरे : (समर्थ गांवकरी)**

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या अकोले तालुक्यातील अतिदुर्गम पेठेची वाडी आणि पाचनई येथील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची नवी पहाट उजाडली आहे. 'अल्केजन' (ALKEGEN) कंपनीचा सामाजिक उत्तरदायित्व निधी (CSR) आणि 'राईड्स' (RYDES) संस्थेच्या माध्यमातून या शाळांना लॅपटॉप, प्रिंटर आणि शुद्ध पाण्याचे आरओ सिस्टीम प्रदान करण्यात आले असून, यामुळे ग्रामीण शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे. सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे असल्याने दुर्गम भागातील विद्यार्थी या प्रवाहात मागे राहू नयेत, यासाठी राईड्स संस्थेचे संस्थापक विवेक दातीर यांच्या संकल्पनेतून हा 'शाळा बळकटीकरण' प्रकल्प राबविण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी डिजिटल साधनांसोबतच आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा असल्याने, त्यांना शाळेतच शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी अत्याधुनिक 'आरओ' वॉटर फिल्टर बसवण्यात आले आहेत. तसेच वर्गातील धूळमुक्त अध्यापनासाठी व्हाईट बोर्डचे वाटपही करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी 'राईड्स' संस्थेचे अथर्व लांडगे, यश लांडगे आणि आकाश आंबरे यांनी विशेष परिश्रम घेतले. भौगोलिकदृष्ट्या कठीण असलेल्या या भागात सर्व साहित्य पोहोचवून त्याचे नेटके नियोजन केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमाला केंद्रप्रमुख शकील बागवान, सरपंच भास्कर बादड, योगेश नवले तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण बांडे यांनी केले, तर विद्यार्थिनी कु. अनुजा भारमल हिने उपस्थितांचे आभार मानले. या उपक्रमाचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत आणि विस्तार अधिकारी बाळासाहेब दोरगे यांनी अभिनंदन केले असून, हा प्रकल्प ग्रामीण गुणवत्तेसाठी मैलाचा दगड ठरेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेची जामखेडमध्ये अवैध दारू विक्रीवर धडक कारवाई

- १.६८ लाखांचा मुद्देमाल जप्त
- चुंबळी शिवारात छापा टाकून एक आरोपी ताब्यात, महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल

**जामखेड तालुका: (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक मा. श्री. सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला कारवाईचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किरणकुमार कवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड परिसरात अवैध दारू विक्रीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली.दिनांक २८/१२/२०२५ रोजी पोउपनि. समीर अभंग, पोलीस अंमलदार



हृदय, घोडके, शामसुंदर जाधव व चालक अरुण मोरे यांचे पथक जामखेड पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्याची माहिती काढत असताना जामखेड–नान्नज रोडवरील चुंबळी गावच्या शिवारात न्यू रशिका हॉटेल येथे तुषार जगताप हा इसम देशी दारूची विक्री करत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यानुसार पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून तुषार विठ्ठल जगताप (वय ३२ वर्षे, रा. शिवाजीनगर, जामखेड) यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष झडती घेतली असता ४४ बॉक्स देशी दारू, प्रत्येक बॉक्समध्ये ४८ सिलबंद बाटल्या असा एकूण १,६८,९६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी पोलीस अंमलदार १५६६ शामसुंदर अंकुश जाधव यांच्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस ठाणे गु.र.नं. ६८३/२०२५ महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास जामखेड पोलीस ठाणे करीत आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली असून अवैध व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

# युवतीची सोशल मीडियावर बदनामी

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

सोशल मीडियाचा गैरवापर करून नेवासा तालुक्यातील एका युवतीची बदनामी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पीडित युवतीच्या नावाने इन्स्टाग्रामवर बनावट खाते तयार करून, तिचे फोटो आणि गावातील एका तरूणाचे फोटो एकत्र करून ते समाजमाध्यमावर प्रसारित करण्यात आले. याप्रकरणी येथील सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ वर्षीय पीडित युवतीने याप्रकरणी फिर्याद दिली आहे. नेवासा तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या युवतीच्या नावाने एका अज्ञात व्यक्तीने इन्स्टाग्रामवर बनावट प्रोफाईल तयार केले होते. या खात्यावर पीडितेचे मूळ फोटो वापरून त्यासोबत चुकीची माहिती जोडण्यात आली.

# 'लोकधारा प्रतिष्ठान' व 'आयएनएस फाऊंडेशन', 'परिस प्रतिष्ठान' तर्फे वर्षाचा शेवट सामाजिक उपक्रमातून साजरा

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

सरत्या वर्षाला निरोप देत , वर्षाचा शेवट भिवंडी तालुक्यातील लोकधारा प्रतिष्ठान' ट्रस्ट , आयएनएस फाऊंडेशन, परिस प्रतिष्ठान तर्फे पडघा केंद्रातील जिल्हा परिषद समतानगर, बोरीवली मराठी शाळेत संविधानातील मूल्यांची विद्यार्थ्यांना ओळख करून , पोस्टरच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत जनजागृती करत २०२५ वर्षाचा शेवट सामाजिक उपक्रम घेऊन करण्यात आला आहे.

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या “घर-घर संविधान” हा उपक्रम २६ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ पर्यंत कालावधीत साजरा होत आहे. त्याच उपक्रमाचे पालन करत ‘लोकधारा प्रतिष्ठान’ ट्रस्ट व आयएनएस फाऊंडेशन भिवंडी, परिस प्रतिष्ठान यांच्या वतीने संविधानातील मूल्यांची




विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली तर पोस्टरच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत जनजागृती करण्यात आली. विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन एकत्रितपणे केले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूलभूत मूल्यांचे आकर्षक पोस्टर सादर करण्यात आले. पोस्टर प्रदर्शनाद्वारे लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव, परिस प्रतिष्ठानचे अध्यक्ष कमलेश जाधव यांनी संविधानातील मूल्ये विद्यार्थ्यांना सांगितली.

यावेळी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव, परिस प्रतिष्ठानचे अध्यक्ष कमलेश जाधव ,मुख्याध्यापिका उषा जाधव, स्वयंसेविका रोशनी दोंदे ,मदतनीस सीमा जाधव ,विद्यार्थी उपस्थित होते.




# स्वर्गीय रेणुका आजी हिरे यांची जयंती साजरी

**देवळा : (समर्थ गांवकरी)**

आदिवासी सेवा समिती, नाशिक संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मानूर येथे कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या धर्मपत्नी स्वर्गीय रेणुका आजी हिरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. भामरे उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. आर. पी. भामरे यांनी सांगितले की, कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्यात रेणुका आजी हिरे यांचे योगदान अत्यंत मोलाचे होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी समर्पित केले. कुटुंबातील संस्कारांची परंपरा त्यांनी जपली व समाजासमोर आदर्श व्यक्तिमत्त्व उभे केले. त्यांच्या कार्यामुळे समाजात त्यांचा नावलौकिक निर्माण झाला, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ए. डी. पानगव्हाणे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे परीक्षा अधिकारी प्रा. एस. एल. पवार, रासेयो अधिकारी व्ही. एस. साबळे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. व्ही. के. बोरसे यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुजित झावरे पाटील यांच्या पाठपुराव्याने आदिवासी समाजाला विजेसाठी ३७.४३ लाख रुपयांचा निधी मंजूर

- स्वातंत्र्यानंतर तब्बल 79 वर्षांनी जांभूळवाडी (खडकवाडी) येथे विजेच्या कामांना मंजुरी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

स्वातंत्र्यानंतर तब्बल 79 वर्षांनंतर 2026 या नवीन वर्षाच्या पूर्वसंधेला पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथील जांभूळवाडी या आदिवासी वस्तीला अखेर वीजपुरवठ्यासाठी निधी मंजूर झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्याने अंधारात



जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजासाठी हा निर्णय ऐतिहासिक ठरणारा असून, या कामासाठी 37 लाख 43 हजार 510 रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती सुजित झावरे पाटील यांनी दिली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात सन 2025-2026 या चालू आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत आदिवासी विकास विभागाच्या वतीने "विद्युत विकास" या मुख्य शीर्षकाखाली आदिवासी उपयोजना (टीएसपी) व उपयोजनाबाह्य (ओटीएसपी) क्षेत्रांमध्ये ग्रामीण विद्युतीकरण व पद्धती सुधारणा या कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याच अंतर्गत पारनेर तालुक्यातील जांभूळवाडी येथे हा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले.

पारनेर तालुक्यातील या वस्तीमध्ये आजवर विजेची सुविधा नसल्यामुळे आदिवासी बांधवांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. शिक्षण, आरोग्य, दैनंदिन कामकाज तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने वीज ही मूलभूत गरज असूनही, अनेक दशके या वस्तीला अंधारात राहावे लागले होते. येथील ग्रामस्थांनी सुजित झावरे पाटील यांच्याकडे ही समस्या मांडल्यानंतर त्यांनी याबाबत वरिष्ठ पातळीवर सविस्तर मांडणी करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे याबाबत मागणी केली. त्यानंतर तातडीने सूत्र हलली आणि हा निधी मंजूर केला गेला आहे. आता या निधीमुळे जांभूळवाडी परिसरात विद्युतीकरणाचे काम मार्गी लागणार असून, ग्रामस्थांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले सुजित झावरे पाटील यांच्यामुळेच हा निधी मंजूर झाल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत असून अंधारातून आता आम्ही खऱ्या अर्थाने उजेडात येणार असल्याची भावना यावेळी तेथील ग्रामस्थांनी व्यक्त केली. आदिवासी समाजाला मूलभूत सुविधा मिळाव्यात, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, त्यांच्या कार्याबद्दल जांभूळवाडीतील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत आभार मानले आहेत.

“आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे, त्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करत आलोय असून यापुढेही समाजातील वंचित समाजासाठी मी कार्य करीत राहणार आहे” असे मत सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले. वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर या परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सुविधा मिळणार असून, आरोग्य सेवा, मोबाईल संपर्क, घरगुती व लघुउद्योग यांना चालना मिळेल. त्यामुळे आदिवासी समाज अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# महापालिकेत स्वाक्षरी अभियान-सेल्फी पॉइंटची निर्मिती

## मुख्य निवडणूक निरीक्षक नतिशा माथुर, भा.प्र.से. यांच्या हस्ते सेल्फी पाईंटचे उदघाटन



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीसाठी नागरिकांमध्ये मतदानाबद्दल उत्सुकता वाढून शंभर टक्के मतदान व्हावे, यासाठी जागृती करण्यासाठी महापालिकेने विविध उपक्रम सुरू केले आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेच्या वतीने मुख्य कार्यालयात 'मी मतदान करणारच' ह्या 'मतदान संकल्प सेल्फी पॉइंट' चे उदघाटन मुख्य निवडणूक निरीक्षक नतिशा माथूर यांच्या हस्ते करण्यात आले.

मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या संकल्पेतून हा सेल्फी पॉइंट साकरण्यात आला आहे. याबाबत माहिती देताना आयुक्त म्हणाले, 'महापालिका निवडणुकीत पालिका प्रशासन मतदानाच्या जनजागृतीसाठी पुढाकार घेऊन विविध उपक्रम राबवत आहे. राज्य घटनेने सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार देऊन एक महत्वाचे शस्त्र हातात दिले आहे. या शस्त्राचा वापर करुन मतदान करणे आवश्यक आहे. नगर शहरातून योग्य उमेदवार निवडला जावा, यासाठी जास्तीत जास्त मतदान होणे गरजेचे आहे. मागील अनुभव लक्षात घेऊन समस्या जाणणारा, कार्यक्षम, उत्साही व समाजसेवक नगरसेवक निवडला जावा, यासाठी शंभर टक्के मतदान करणे गरजेचे आहे. एक सुज्ञ मतदार या नात्याने मतदानाच्या दिवशी कुठेही सहलीला न जाता किंवा मतदानास टाळाटाळ न करता आपला मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहनही आयुक्तांनी केले.

शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सुध्दा मतदानासाठी जागरुकता निर्माण होण्यासाठी सदरील उपक्रम स्तुत्य असुन निवडणुकीच्या माध्यमातुन देशामध्ये लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी मतदारांनी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे, भारत देशामध्ये जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था अस्तित्वात असुन या व्यवस्थेला कायम ठेवण्यासाठी नागरीकांनी जास्तीत जास्त मतदान करावे असे आवाहन यावेळी मुख्य निवडणूक निरीक्षक नतिशा माथूर यांनी केले.

याप्रसंगी सहाय्यक निवडणूक निरीक्षक महेद्रकुमार कांबळे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुकेवार, उपायुक्त अभिजित वायकोस, उपायुक्त नितीन गाढवे, उपायुक्त स.अजितपालसिंघ संधु, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, दिलीप टाकळीकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.हनुमंत रिठ्ठे, सहाय्यक आयुक्त मो.गुलाम सादेक, शिक्षणधिकारी नागराज बनसोडे, सिस्टीम मॅनेजर सदाशिव पतंगे, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे, भांडारपाल नागनाथ पतंगे, स्विय सहाय्यक महेश आसणे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# कोतकरांची महापालिका निवडणुकीतून माघार !

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणूक कोणत्याही परिस्थितीत लढवायचीच, असा ठाम निर्धार करत भानुदास कोतकर यांनी केडगावात राजकीय डाव मांडला त्यात अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मुदतीच्या काही तास आधीच त्यांचा डाव मोडला! शिवसेनेची उमेदवारी नाकारण्यासोबतच कोतकर महापालिकेच्या राजकीय पटावरून बाजूला गेले. कोतकरांच्या अचानक माघारीने इच्छुक उमेदवारांसोबतच अवघे नगर अंचबित झाले. भानुदास कोतकर यांनी केडगावातील प्रभाग १६ आणि १७ मधील आठ जागांवर समर्थकांना उमेदवारी देत निवडणूक लढविण्याचा निर्णय पक्का केला. इच्छुक समर्थकांना भाजपच्या मुलाखतीला पाठविले, मात्र कोतकर समर्थकांच्या उमेदवारीविरोधात केडगावातील भाजप निष्ठावंत पेटून उठला. परिणामी भाजपने कोतकर समर्थकांच्या उमेदवारीला कोणताच प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे कोतकर यांनी आठ उमेदवार निश्चित करत स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आणि प्रचाराचे नारळही फोडले. समर्थकांनी झपाटल्यागत प्रचार सुरू केला. दरम्यानच्या काळात राजकीय घडामोडी वेगवान होत गेल्या. महायुतीतून शिवसेना बाहेर पडताच कोतकर शिवसेनेत जाणार असल्याची चर्चा सुरू झाली. सेनेनेही त्याला सकारात्मक प्रतिसाद देण्यास सुरुवात केली. सोमवारी सायंकाळी शिवसेनेकडून कोतकरांना सहा जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला. कोतकर समर्थकांना शिवसेनेची उमेदवारी दिल्यानंतर शिवसेनेचे दिलीप सातपुते यांचे पाठबळ वाढणार होते. दोघांत दिलजमाई करण्याचा प्रयत्नही सुरू झाला. कोतकर समर्थकांना शिवसेनेची उमेदवारी देण्याची तयारी दर्शवत जिल्हाप्रमुख अनिल शिंदे सकाळीच एबी फॉर्म घेऊन केडगावात दाखल झाले. मात्र ऐनवेळी भानुदास कोतकर यांनी समर्थकांना शिवसेनेची उमेदवारी न करण्याचा निर्णय कळविला. कोतकरांच्या ऐनवेळच्या नकाराने शिवसेनेचे नेते गेले तसेच केडगावातून माघारी परतले. त्यामुळे केडगावात ऐनवेळी उमेदवार शोधताना दिलीप सातपुते यांची धावपळ उडाली. राखीव जागेवर नवीन चेहरा देतानाच उबाठा सेना आणि भाजपने डावलेल्यांना शिवसेनेची उमेदवारी देण्याची वेळ त्यांच्यावर आली. भानुदास कोतकर यांचा निर्णय त्यांच्या समर्थक इच्छुकांसाठी अंतिम होता. शिवसेनेची उमेदवारी मिळणार हे गृहीत धरून समर्थकांनी अर्ज भरण्यास सुरुवातही केली.

# मुंब्रादेवी कॉलनीत नवीन बुद्धविहाराचे लोकार्पण



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिवा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय परिवर्तन यांच्या वतीने भीमगर्जना बहुदेशीय संस्थेअंतर्गत मनुबाई विनायक भोईर यांच्या स्मरणार्थ नवीन बुद्ध विहाराचे लोकार्पण करण्यात आले. दिवा शहरात बौद्ध समाज हा मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे. पण त्यांच्यासाठी घराजवळ समाजमंदिर उपलब्ध नसल्याची खंत अनेकांच्या मनात होती. ही बाब ओळखून नितीन विनायक भोईर यांनी स्व:मालकीची जागा देऊन बुद्ध विहाराच्या कामासाठी पुढाकार घेतला. दिव्यातील अनेक समाजसेवक यांनी त्यांच्या या कामात हातभार लावत मोलाचे सहकार्य केल व अल्पावधीतच भव्य असे बुद्ध विहार उभे राहिले. प्रसंगी नरसिंग दत्तू गायसमुद्रे राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या उपस्थित लोकार्पण करण्यात आले.

जगाला शांतीचा संदेश देणाऱ्या गौतम बुद्धांच्या मूर्तीची स्थापना या ठिकाणी करण्यात आली असून हे बुद्ध विहार फक्त समाजमंदिर म्हणून न राहता वाचनालय, आणि स्पर्धा परिक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकाही असणार आहे.

अशी माहिती महामाया बुद्ध विहाराचे संस्थापक नितीन भोईर यांनी दिली आहे.आंबेडकर चळवळीतील लोकभावना तसेच बौद्ध धार्मियांचा तत्वाचे येथे योग्यरितेने पालन करून अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येतील असे यावेळी भोईर यांनी बोलताना स्पष्ट केले आहे. प्रसंगी सरला गायकर, शरद गायकर, रोहित बागुल, अमोल जाधव, सविता कदम आदी समाजबांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्मचाऱ्यांची वानवा

**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

बिलोली उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात कर्मचाऱ्यांची वानवा असल्याने रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. प्रयोगशाळा सहाय्यक व्यंकटेश बोरकर हे अनेक महिन्यांपासून इतर ठिकाणी प्रतिनियुक्तीवर असल्याने रुग्णालयातील कामकाज तसेच रुग्णांच्या रक्त, लघवी आणि इतर तपासणीसाठी त्रास होत असल्याचे माहिती अधिकार तथा सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी म्हटले आहेत. याबाबत डॉ. मोरे यांना विचारले असता त्यांना परत इकडे बोलावण्यासाठी अनेक पत्रव्यवहार केले असल्याचे म्हटले आहेत. वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कमी असल्याने रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास अडथळा निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

# आम्ही मत देऊ शकत नाही पण तुम्ही द्या; शालेय विद्यार्थ्यांकडून मतदार जनजागृती

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

येत्या 15 जानेवारी रोजी होत असलेल्या ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन अँड इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन (स्वीप) कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत विभागीय क्रीडा महोत्सवाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांनी आम्ही मत देऊ शकत नाही, पण तुम्ही द्या घोषवाक्याखाली मतदानाची जनजागृती केली.




आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांच्या सूचनेनुसार उपायुक्त तथा नोडल अधिकारी मिताली संचेती यांच्या सहकार्याने नौपाडा–कोपरी प्रभाग समितीच्या निवडणूक निर्णय अधिकारी प्रज्ञा सावंत आणि उथळसर प्रभाग समिती निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांच्या पुढाकाराने स्वीप पथकाच्या वतीने नौपाडा–कोपरी प्रभाग समिती आणि उथळसर प्रभाग समिती अंतर्गत या मतदान जनजागृती अभियानाचे आयोजन वीर सावरकर मैदान येथे करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांमध्ये मतदानाचे महत्त्व रुजवणे तसेच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचवण्याच्या उद्देशाने मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.

यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी “आम्ही मत देऊ शकत नाही, पण तुम्ही द्या!”, “मतदान करा, लोकशाहीचा विजय करा” अशा प्रभावी घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधले. मतदानाच्या दिवशी सुट्टीचा गैरवापर न करता सहलीस जाणे किंवा घरी न थांबता मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे, असे आवाहन विद्यार्थ्यांनी भावनिक संदेशांच्या माध्यमातून पालकांना केले. विद्यार्थ्यांनी हातात फलक घेऊन विविध घोषणांद्वारे प्रामाणिक व निर्भय मतदानाचा संदेश दिला. “मतदान करा, मतदान करा, लोकशाहीचा विजय करा” या संकल्पनेतून सर्व नागरिकांनी येत्या 15 जानेवारी 2026 रोजी न चुकता मतदान करावे, असे प्रेरणादायी आवाहन यावेळी करण्यात आले.

# काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराचा शेवटच्या क्षणी बीफॉर्म लंपास

- स्व. शंकररावजींच्या निष्ठावंत घराण्यालाच दगाफटका



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी कार्यकर्त्यांसह वाजत-गाजत गेलेल्या काँग्रेसच्या एका अधिकृत उमेदवाराचा शेवटच्या क्षणी काँग्रेस प्रतिनिधीनेच बीफॉर्म पळविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार घडताच उमेदवाराने खा.रवींद्र चव्हाण यांच्यासह अन्य काँग्रेसी पदाधिकाऱ्यांना कडक शब्दात जाब विचारून धारेवर धरले. या घटनेमुळे काँग्रेसमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. प्रभाग क्र.6 मधून काँग्रेसच्यावतीने काँग्रेसचे निष्ठावंत व स्व.शंकररावजी चव्हाण यांचे विश्वासू व माजी उपनगराध्यक्ष स्व.संग्राम पोमदे यांचे पुत्र संजय पोमदे यांना उमेदवारी देण्यातआली. मंगळवारी दुपारी 12 वाजता त्यांना खा.रवींद्र चव्हाण यांनी बीफॉर्म दिला. उमेदवारी अर्ज व बीफॉर्म घेऊन संजय पोमदे दुपारी 2 च्या सुमारास मिरवणुकीसह वाजत-गाजत कार्यालयाकडे निघाले. मिरवणूक संपल्यानंतर ते काही पदाधिकाऱ्यांना घेऊन कार्यालयात गेले. त्याचवेळी एका काँग्रेस प्रतिनिधीने झेरॉक्स काढण्याचा बहाणा करून त्यांच्याकडून अर्ज व बीफॉर्म काढून घेतला. बिफॉर्म कुठे आहे? अशी विचारणा पोमदे यांनी इतर उमेदवारांकडे केली असता तुमचा बीफॉर्म परत गेल्याचे त्यांना सांगण्यात आले. आपल्यासोबत दगाफटका झाल्याचे लक्षात येताच अखेरच्या क्षणी पोमदे यांना अपक्ष उमेदवारी दाखल करावी लागली. पोमदे यांनी हा प्रकार खा.रवींद्र चव्हाण यांच्या निदर्शनास आणून दिला असता त्यांच्याकडूनही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. वरिष्ठांच्या वरिष्ठांचा हस्तक्षेप व दबावामुळे बीफॉर्म परत घ्यावा लागल्याचे पोमदे यांना सांगण्यात आले. माझ्या प्रभागतले तीन बीफॉर्म मला देण्यात आले होते. त्यात माझाही बीफॉर्म होता. वेळ कमी असल्यामुळे मी माझा अर्ज भरण्यात व्यग्र होतो. तिन्ही बीफॉर्म मी एका उमेदाराकडे सोपवले होते. काही वेळात माझा बीफॉर्म गायब झाल्याचे माझ्या लक्षात आले. माझा बीफॉर्म जिल्हाध्यक्ष राजेश पावडे यांचे नातेवाईक अशोक पावडे यांना दिल्याचे नंतर समजले. काँग्रेस नेते आ.अमित देशमुख यांचा संदेश आल्यामुळेच असे करावे लागल्याचे खा.रवींद्र चव्हाण यांनी मला सांगितले. अशी माहिती संजय पोमदे यांनी दिली.

संजय पोमदे यांचे वडिल स्व. संग्राम पोमदे हे माजी केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक आणि विश्वासू होते. 1985 ते 1990 या कार्यकाळात ते नांदेडचे उपनगराध्यक्ष राहिले. शासकीय अभियंत्याची नोकरी सोडून ते स्व.चव्हाण यांच्यासोबत राजकारणात उतरले होते. काँग्रेसचे अत्यंत निष्ठावंत घराणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोमदे यांच्यासोबत घडलेल्या प्रकारामुळे त्यांच्या समर्थकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# शासनाच्या घरभाड्यावर डल्ला

**तामसा: (समर्थ गांवकरी)**

हदगांव तालुक्यातील जिल्हा परिषद शिक्षक, कर्मचारी, विविध कार्यालीन कर्मचाऱ्याचं नांदेड वरून "अपडाऊन "थांबेना. कर्मचाऱ्यांचा मुख्यालय राहणं बंधनकारक असून नियमाची पायमल्ली करत जिल्हा परिषद, खाजगी संस्थेचे शिक्षक नांदेड वरून "ये -जा "करतात कार्यालीन कामकाज च्या वेळ, मुख्यालय राहणं बंधनकारक असून परिसरातील एक्का दुक्का कर्मचारी सोडून आपल्या मुलांचे शिक्षण सोयीस्कर व्हावं म्हणून हे शिक्षक नांदेड ला राहणं प्रथम पसंदी नेमणूक करतात. या वागणुकी मुळे ग्रामीण भागात सकाळी, संध्याकाळी मुख्यमार्गांवर मंत्र्याच्या ताफ्यासारखं पाहायला मिळतो. शासनाने ठरवलेल्या प्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्यांना वेतन, घर भाडे देण्यात येतो परंतु आपल्या सोईस्कर पद्धत कार्यप्रणाली मुळे शासनाचे घरभाडया वर डल्ला मारत सर्वस कर्मचारी आपल्या स्वतः च्या अथवा नांदेड ला राहून शासनाच्या बोजवारा वाढवत आहे.

# बस-दुचाकी अपघातात युवकाचा मृत्यू

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर-मनमाड रस्त्यावरील देहरे येथे बस व दुचाकीचा अपघात झाला होता. यात रितेश खजिनदार (२० वर्ष) युवकाचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी संतप्त नागरिकांनी मंगळवार सकाळपासूनच देहरे येथे देहरे, विळद, शिंगवे, नांदगाव ग्रामस्थांनी अहिल्यानगर- मनमाड रस्त्यावर ठिय्या दिला. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक अडीच तास ठप्प झाली होती. दरम्यान राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात येतील असे आश्वासन दिल्याने रास्तारोको मागे घेतला. अहिल्यानगर- मनमाड महामार्गावरील पडलेल्या खड्डयांमुळे आत्तापर्यंत शेकडोजणांचा मृत्यू झाला आहे. वारंवार मागणी करुनही रस्त्यावरील खड्डे बुजविले जात नाहीत. देहरे येथील पोलिस पाटील यांचा मुलगा खजिनदार दुचाकीवरुन जात असतांना बसने दिलेल्या धडकेत त्याचा मृत्यू झाला. आत्तापर्यंत रस्त्यावरील खड्डयांमुळे शेकडोजणांचा मृत्यू झाला आहे. रस्त्याचे काम सुरु करण्याच्या मागणीसाठी आणि रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी देहरे, विळद, शिंगवे, नांदगाव, जेऊर येथील नागरिकांनी आक्रमक भूमिका घेत मंगळवारी सकाळी रस्त्याचे काम सुरु होत नाही तोपर्यंत रास्तारोको आंदोलन केले. दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणच्या अधिकाऱ्यांनी अहिल्यानगर- मनमाड महामार्गावरील खड्डे तात्काळ बुजविले जातील असे आश्वासन दिले. त्यानंतर ग्रामस्थांनी रास्तारोको आंदोलन मागे घेतले. यावेळी सरपंच जालिंदर कदम, राजकुमार आघाव, व्ही. डी. काळे, विश्वास जाधव, अनिल चोर, महेंद्र कोळपकर, प्रकाश लांडगे, विठ्ठल पठारे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी यांनी पोलिस बंदोबस्त तैनात केला होता.

### '२० वर्षांपासून भुयारी मार्ग रखडला'

देहरे गावाच्या मधून अहिल्यानगर-मनमाड महामार्ग गेला आहे. तसेच येथून रेल्वे लाईनही गेलेली आहे. महामार्गालगत दोन्ही साईटला गाव असल्यामुळे भुयारी मार्ग करण्याची ग्रामस्थांची मागणी आहे. गेल्या २० वर्षापासून भुयारी मार्ग रखडला आहे. प्रशासनाला अजून किती बळी हवे आहेत. असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला.

# शिवाजीनगरमध्ये गांजाची अवैध विक्री उघडकीस

- स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई
- तिघांकडून ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

शहरातील शिवाजीनगर परिसरात सुरू असलेल्या गांजाच्या अवैध व्यापारावर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तीन जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे दोन किलो २०० ग्रॅम वजनाचा, अंदाजे ५० हजार रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांना गुप्त बातमीदारामार्फत शिवाजीनगर येथील नई आबादी परिसरात गांजा विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक वसंत आरसेवार यांच्या नेतृत्वाखाली पथकाने मंगळवारी सायंकाळच्या सुमारास भाजीपाला गाड्याजवळ सापळा रचून छापा टाकला.छाप्यात इसाक मोहम्मद युसुफ (वय ५०), शेख अनिस (दोघेही रा. नई आबादी, शिवाजीनगर) तसेच शंकर ऊर्फ भोला अशोक वगरे (रा. जयभीमनगर, नांदेड) या तिघांना अटक करण्यात आली. झडतीदरम्यान त्यांच्या ताब्यात मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. या प्रकरणी सहाय्यक पोलिस निरीक्षक वसंत आरसेवार यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून हा गांजा नेमका कुठून आणण्यात आला आणि तो कोणाला विक्रीसाठी नेण्यात येणार होता, याचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# सोलर कंपनीकडुन शेतात पोल उभे करण्यासाठी शेतकऱ्यांवरच दडपशाही

## विरोध करणारे शेतकरी पोलिसांच्या ताब्यात

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर मध्ये अवादा या सोलर कंपनीकडुंन शेतकरांच्या खाजगी जागेत पोल उभारण्याचे काम चालू असुन संबंधित शेतकऱ्यांची परवानगी अथवा मोबदला न देता मंगळवारी शेतकरांवर दडपशाही करत काम सुरू आहे त्यामुळे टाकळी ढोकेश्वर येथील अनेक संतप्त शेतकरांनी याला विरोध केला असून मोबदला द्या अन्यथा काम करु देणार असा पावित्रा घेतल्याने संबंधित शेतकरांना पारनेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे त्यामुळे प्रशासनाच्या या भुमिकेचा शेतकरांनी निषेध केला आहे.यावेळी तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्या सह मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी शेतकरी व कंपनी प्रतिनिधी अधिकारी यांच्याशी चांगलीच शाब्दिक बाचाबाची पण झाली.यासबंधीची प्रतिक्रिया घेण्यासाठी तहसीलदार सौंदाणे यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी टाळले.



गेल्या आठवड्यात टाकळी ढोकेश्वर येथील शेतकरी बाबासाहेब सखाराम झावरे,शिवाजी सखाराम झावरे, देविदास आल्हाट,संकेत अशोक झावरे,श्रावण गायकवाड विनोद गायकवाड यांच्या सह अनेक शेतकरांनी यासंबंधीचे लेखी निवेदन जिल्हाधिकारांना दिले होते त्यामुळे यासंबंधी तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैंठक पण आयोजित करण्यात आली होती.शेतकरी यांच्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही यासाठी सदर काम त्वरीत स्थगित करण्याचे आदेश आपण देऊन समस्त शेतकरांना न्याय मिळवुन द्यावा अशी मागणी केली होती.तरी पण मंगळवारी पोलिस बंदोबस्तात दडपशाहीने सदर कंपनीने हे काम सुरू केले संबंधित शेतकरी न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार आहेत. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील गायरान जमीन सौर ऊर्जा प्रकल्पासाठी ५१ एकर जमीन आवादा कंपनीला १ रुपये भाड्याने देण्यात आल्यानंतर सौरऊर्जा प्रकल्प बेकायदेशीर ग्रामसभासह इतर कारणांमुळे कायमच वादाच्या भोवरात सापडला आहे.तर शेतकरांच्या हद्दीतुन विनापरवाना सौर उर्जा प्रकल्पाच्या ठेकेदाराकडुन विजेचे पोल उभे केले जात असून याला अनेक शेतकरांचा विरोध आहे. या सौर उर्जा प्रकल्पाचे काम आवादा कंपनी मार्फत सुरू असुन आवादा कंपनीने SM इंटरनॅशनल कंपनीला पोल उभे करून लाईन ओढण्याचे काम (टेंडर) दिलेले आहे. या कंपनी मार्फत अनाधिकृत पणे तसेच दडपशाही पध्दतीने व शेतकरांवर अन्याय करुन व कुठल्याही परवानगी अथवा मोबदला न देता हे काम सुरू केले आहे.मंगळवारी या कंपनीच्या माध्यमातून मजुरांकडून पोल उभे करून तारा ओढण्याचे काम चालु करण्यात आले आहे. या कामाचा काही शेतकरी विरोध करायला गेल्यानंतर त्या ठिकाणी त्यांना संबंधित अधिकाऱ्यांकडून दमबाजीची भाषा करण्यात आली.मंगळवारी कोणतेही पूर्व कल्पना न देता महसुल व पोलिस अधिकारांनी पोल उभे करण्यास यंत्रणा उभी केल्याने या यंत्रणेला विरोध करणारा जमीनीचे मालक असणारा शेतकरांना पारनेर पोलिसांनी अटक केली असून त्यांना पारनेर पोलिस ठाण्यात नेण्यात आले आहे.